मुख्य कामगार अधिकारी
रा. प. मध्यवर्ती कार्यालय,
मुंबई - ४०० ००८.

# कामगार करार

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

आणि

महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कामगार संघटना
(मान्यताप्राप्त)

यांच्यामधील

## समझोत्याचे निवेदनपत्र

(दि.१.४.१९९६ ते ३१.३.२०००)




वाशी, नवी मुंबई.

4762 2015

M. S. R. T. C.

D. Lad

8 OCT 1999

स्टॅम्प वेंडर

### समझोत्याचे संक्षेप लेख

**औद्योगिक विवाद अधिनियम १९४७ चें कलम २ (प) सहित कलम १८ (१) औद्योगिक विवाद (मुंबई) नियम १९५७ चा नियम ६२ च्या अन्वये)**

### उभयपक्षकारांची नावे

नियोक्त्याचे (मालकाचे) प्रतिनिधी :- श्री. उज्ज्वल उके
व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ.

कामगारांचे प्रतिनिधी :- श्री. हनुमंत ताटे.
सरचिटणीस,
महाराष्ट्र एस.टी. कामगार संघटना.
(महाराष्ट्र श्रमिक संघ मान्यता व अनुचित कामगार प्रथा प्रतिबंध कायदा १९७१, कलम १२ नुसार मान्यता प्राप्त संघटना प्रमाणपत्र क्र. ८/९५.)

### प्रकरणाचे संक्षिप्त कथन

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे व्यवस्थापन आणि महाराष्ट्र एस.टी. वर्कर्स फेडरेशन (इंटक), महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कामगार संघटना व महाराष्ट्र मोटर कामगार फेडरेशन, प्रांतीय राष्ट्रीय मोटर कामगार युनियन, कास्ट्राईब राज्य परिवहन कर्मचारी संघटना, महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कामगार सेना, महाराष्ट्र एस.टी. ट्रॅफिक सुपरवायझर्स असोसिएशन, महाराष्ट्र परिवहन मजदूर युनियन, महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट वर्कर्स युनियन इंटक यांच्यात दिनांक १५.१०.९४ रोजी झालेल्या कामगार कराराचा कालावधी दिनांक १.४.९२ ते ३१.३.९६ या चार आर्थिक वर्षासाठी होता.

महाराष्ट्र श्रमिक संघ मान्यता व अनुचित कामगार प्रथा प्रतिबंध कायदा १९७१ च्या कलम १२ अन्वये औद्योगिक न्यायालय, मुंबई यांनी महाराष्ट्र एस.टी. कामगार संघटना ही मान्यता प्राप्त संघटना असल्याचा दिनांक १६.२.९५ रोजी निर्णय दिला. मा. निबंधक, औद्योगिक न्यायालय, मुंबई यांनी महाराष्ट्र एस. टी. कामगार संघटना ही मान्यताप्राप्त संघटना असल्याबद्दल दिनांक ६.३.९५ रोजी प्रमाणपत्र दिले. सदर कायद्यातील कलम २०-सी अन्वये व्यवस्थापनाबरोबर सर्वसाधारण व धोरणात्मक प्रश्नावर चर्चा करण्याचे अधिकार मान्यताप्राप्त संघटनेला आहेत. औद्योगिक कलह अधिनियम १९४७ च्या कलम

११(२)ए अन्वये मान्यताप्राप्त संघटनेस अस्तित्वात असलेले सर्व करार दोन महिन्याची नोटीस देऊन संपुष्टात आणण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत. या तरतुदीच्या आधारे मान्यताप्राप्त संघटनेने पत्र क्र.३४८/९५, दिनांक २६.४.९५ अन्वये मागील सर्व करार संपुष्टात आणण्याची व्यवस्थापनास नोटीस दिली. तथापि, काही कायदेशीर अडचणीमुळे नवीन करार होऊ शकला नाही.

नवीन कामगार करारासाठी महाराष्ट्र एस.टी.कामगार संघटना (मान्यता प्राप्त) यांनी त्यांचे पत्र क्र. ६१५/९६ दिनांक ८.८.९६ नुसार मागण्यांचा मसुदा व्यवस्थापनास सादर केला.

सदर मागणी मसुद्यावर संघटनेशी चर्चा करण्यासाठी महामंडळाने ठराव क्र.९६.१०.०७ दिनांक ८.१०.९६ अन्वये मा.व्यवस्थापकीय संचालक यांचे अध्यक्षतेखाली वाटाघाट समिती गठीत केली. संघटनेच्या मागणी मसुद्यात नवीन वेतन श्रेणीचा प्रमुख मुद्दा होता. त्यात पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारसीचा पर्याय खुला ठेवून मागणी केली होती. तथापि, पाचव्या वेतन आयागोच्या शिफारशी त्यावेळेपर्यत राज्य शासनाने त्यांच्या कर्मचा-यांना लागू केलेल्या नव्हत्या. म्हणून सदरची मागणी बाजूला ठेवून मागणी पत्रातील अन्य मागण्यांवर वाटाघाट समितीच्या बैठकीत मान्यताप्राप्त संघटनेच्या प्रतिनिधींशी चर्चा करुन वाटाघाट समितीने शिफारशी केल्या.

वाटाघाटी चालू असताना प्रारंभी मागण्यांच्या मसुद्यावर अंतिम समझोता होईपर्यत अंतरिम सहाय्य देण्याच्या मागणीशी वाटघाटी केंद्रीत झाल्या व राज्य शासनाच्या मध्यस्थीने अंतरिम सहाय्यापोटी रुपये ३६ कोटी दरवर्षी वाटप करण्याचे मान्य केले व सदरची रक्कम दिनांक १.४.९६ पासून नियमित व रोजंदार पदावरील कर्मचा-यांना दिनांक ३१.३.९६ रोजी सेवेत असलेल्या कर्मचा-यांच्या मूळ वेतनाच्या १८.५ टक्के परंतु कमीत कमी दरमहा रुपये २००/- व जास्तीत जास्त रुपये ४५०/- इतके अंतरिम सहाय्य देण्याचे मान्य केले. समझोत्यावर स्वाक्ष-या झाल्यानंतर कामगारांना अंतिमतः देय होणा-या थकबाकीतून वर उल्लेख केलेल्या अंतरिम सहाय्याची रक्कम समायोजित करण्याचे मान्य करण्यात आले.

राज्य शासनाने त्यांच्या कर्मचा-यांना पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू केल्यानंतर त्या आधारे मान्यता प्राप्त संघटनेने सुधारित वेतन श्रेणीच्या तक्त्यासह नविन वेतन श्रेणीची मागणी त्यांचे पत्र क्र.१३२२/९८ दि.३०.१२.९८ अन्वये दि.२.१.९९ रोजी झालेल्या वाटाघाट समितीच्या बैठकीत सादर केले. सदर वेतन श्रेणीबाबत व्यवस्थापन व मान्यता प्राप्त संघटना प्रतिनिधी यांचेमध्ये एक मत न झाल्याने दिनांक १८.४.९९ रोजी मा.मुख्यमंत्री यांनी संघटनेच्या प्रतिनिधीसमवेत चर्चा केली व मा.मुख्यमंत्र्यांनी करारापोटी पहिल्या वर्षी रुपये ७२ कोटी पॅकेज डिल म्हणून द्यावे असे सुचित केले. त्यानंतर शासनाने त्यांचे पत्र क्र.एसटीसी.३४९९/ ११७३/प्र.क्र.५१/परिवहन-१, गृह विभाग, मंत्रालय, दिनांक १.१०.९९ अन्वये खालीलप्रमाणे कळविले आहे.

१) शासन कोणतेही आर्थिक सहाय्य, अनुदान किंवा अर्थसंकल्पीय आधार सुधारित वित्तलब्धी किंवा थकबाकी देण्यासाठी महामंडळास देणार नाही.. महामंडळाने ही महत्वाची बाब वेतन कराराला अंतीम रुप देतांना व त्यावर सही करतांना काळजीपूर्वक लक्षात घ्यावी.

२) प्रास्तावित वेतन सुधारणेमुळे येणा-या अतिरिक्त आर्थिक भाराची पुर्तता होण्याच्या दृष्टीने कामगारांची व कर्मचारी वर्गाची उत्पादन क्षमता वाढविण्याच्या प्रस्तावांचा वेतन करारामध्ये समावेश करण्यात यावा.

३) कर्मचारी संघटनांशी विचार विनिमय करुन व्यवस्थापनाने प्रस्तावित वेतन करारास लवकरात लवकर अंतीम रुप द्यावे व त्यावर सर्व संबंधीतांच्या सहया घेण्यात याव्यात. जेणेकरुन शक्यतो ऑक्टोबर १९९९ चे वेतन दिनांक १ नोव्हेंबर १९९९ रोजी अदा करणे व्यवस्थापनास शक्य होईल.

४) वेतन सुधारण्याचे अंतीम आदेश निर्गमित करण्यापूर्वी गृह विभागामार्फत वित्त विभागाची पूर्व मान्यता घेण्यात यावी.

त्यावर व्यवस्थापन व संघटना प्रतिनिधी यांच्यामध्ये चर्चा होऊन उभय पक्षी समझोता करण्यात आला.

| अ.क्र. | मागणी | समझोता ३ |
|---|---|---|
| (१) | समझोत्याचा कालावधी | हा समझोता दि.१.४.१९९६ ते ३१.३.२००० या कालावधीच्या चार (४) वित्तीय वर्षासाठी कार्यान्वित राहील. |
| (२) | अंतरीम सहाय्य व त्याचे समायोजन | मागण्यांच्या समझोत्यावर अंतिम निर्णय होईपर्यंतच्या कालावधीमध्ये कामगारांना दि.१.४.९६ पासून त्यांच्या दि.३१.३.९६ रोजीच्या मूळ वेतनाच्या १८.५ टक्के परंतु कमीत कमी दरमहा रुपये २००/- व जास्तीत जास्त रुपये ४५०/- इतके अंतरिम सहाय्य यापूर्वीच देण्यात आले आहे. सदर अंतरीम सहाय्य दि.१.१०.९९ पासून काढून घेतल्याचे समजण्यात येईल आणि अंतरीम सहाय्यादाखल आतापर्यंत देण्यात आलेल्या रकमेचे सदर समझोत्यानुसार कामगारांना देय असलेल्या रकमेशी समायोजन करण्यात येईल. |
| (३) | सुधारित वेतन श्रेणी | सुधारित वेतन श्रेणी जोडपत्र 'अ' मध्ये दर्शविल्यानुसार दि. १.४.१९९६ पासून अंमलात येईल. |
| | १. सुधारित वेतन श्रेणीत करावयाच्या वेतन निश्चितीचे सूत्र | जे कर्मचारी दि.३१.३.१९९६ रोजी महामंडळाच्या सेवेत होते. त्यांच्या बाबतीत दि.३१.३.१९९६ रोजी धारण केलेल्या मूळ पदाचे मूळ वेतन (विशेष वेतन वगळून) अधिक दि.३१.३.१९९६ रोजीच्या मूळ वेतनाच्या १४८ टक्के अनुज्ञेय महागाई भत्ता (ज्या कर्मचा-यांचे मूळ वेतन ३१.३.१९९६ रोजी रुपये ३५०१/- किंवा त्यापेक्षा जास्त आहे. त्यांच्या दि.३१.३.१९९६ च्या मूळ वेतनाच्या १११ टक्के परंतु किमान रुपये ५१८०/-) अधिक दि.३१.३.१९९६ च्या मूळ वेतनाच्या २५ टक्के इतकी रक्कम परिगणित करण्यात येईल. अशा त-हेने परिगणित करुन येणारी एकूण रक्कम जर सुधारित वेतनश्रेणीत तो वेतन टप्पा असेल तर त्या वेतन टप्प्यावर, अन्यथा पुढील वेतन टप्प्यावर दि.१.४.१९९६ रोजी सुधारित वेतन श्रेणीत वेतन निश्चित करण्यात येईल. परंतु अशी येणारी रक्कम जर सुधारित वेतन श्रेणीच्या किमान वेतन टप्प्यापेक्षा कमी असेल तर वेतन श्रेणीच्या किमान टप्प्यावर वेतन निश्चित करण्यात येईल. मात्र अशा प्रकारे काढलेली रक्कम सुधारित वेतन श्रेणीतील कमाल वेतन टप्प्यापेक्षा जास्त असेल तर, अशा कर्मचा-यांच्या बाबतीत .शेवटच्या वेतन वाढीच्या दराने आवश्यक तेवढया तदर्थ वेतन वाढी मंजूर करुन १.४.१९९६ रोजी सुधारित वेतन श्रेणीत वेतन निश्चित करण्यात येईल. |
| | २. नियमित/हंगामी बढत्यासाठी तसेच निवडश्रेणी व श्रेणीकरणा नंतर करावयाची वेतन निश्चिती | नियमित बढत्यासाठी १ एप्रिल १९९६ पासून नेहमीच्या नियमानुसार वेतन सुधारण्यात येईल. सदर तरतुद तात्पुरत्या बढतीसाठी,निवड श्रेणी / श्रेणीकरणासाठीही लागू राहील. तसेच जे कर्मचारी दि.१.४.१९९६ रोजी किंवा तदनंतर म्हणजेच ३१.३.२००० पर्यंत त्यांच्या सुधारित वेतन श्रेणींच्या कमाल टप्प्यावर अथवा पुढे पोहोचले आहे. आणि असे कर्मचारी बढतीस किंवा निवड श्रेणीस/ श्रेणीकरणास पात्र झाले आहेत. त्यांना त्यादिवशी त्यांनी धारण केलेल्या पदाच्या वेतन श्रेणीत मिळणारे वेतन जर बढतीच्या किंवा निवड श्रेणीच्या/ श्रेणीकरणाच्या कमाल टप्प्यावर किंवा पुढे पोहोचले असेल तर, बढतीच्या/ हंगामी बढतीच्या व |

| अ.क्र. | मागणी | समझोता |
| --- | --- | --- |
| | | निवड श्रेणीच्या/ श्रेणीकरणाच्या प्रचलित नियमानुसार आवश्यक तेवढ्या तदर्थ वेतन वाढी मंजूर करुन पदोन्नतीच्या पदाच्या वेतन श्रेणीत किंवा निवड श्रेणीच्या वेतन श्रेणीत वेतन निश्चिती करण्यात येईल. |
| | ३. रोजंदार व अंशकालीन कर्मचा-यांच्याबाबत | दि.३१.३.९६ रोजी महामंडळाच्या सेवेत असलेले रोजंदार गट-१ व २ कर्मचारी कराराच्या फायद्यास अनुज्ञेय राहतील व त्यांच्या रोजंदारी दरात १.४.९६ पासून खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येईल.<br>अ) रोजंदार गट-१ कर्मचा-यांच्या बाबतीत ते ज्या पदावर काम करीत असतील त्या पदास लागू असलेल्या असुधारित वेतन श्रेणीच्या किमान टप्प्याच्या किंवा दि.३१.३.१९९६ चे मूळ वेतन दराच्या २५ टक्के अधिक १४८ टक्के महागाई भत्ता इतकी रक्कम मिळून त्यांचा सुधारित मूळ वेतन दर निश्चित करण्यात यावा.<br>ब) १. रोजंदार गट-२ कर्मचा-यांच्या बाबतीत ते ज्या वेतन श्रेणीत काम करीत असतील त्या वेतन श्रेणीत ते त्यांच्या दि.३१.३.९६ चे मूळ वेतन दराला २६ या गुणांकांनी गुणून मासीक वेतनात रुपांतर करुन त्याच्या २५ टक्के रक्कम इतकी अधिक १४८ टक्के महागाई भत्ता इतकी रक्कम मिळून येणारी रक्कम जर सुधारित वेतन श्रेणीत तो टप्पा असेल, तर त्या टप्प्यावर अन्यथा पुढील टप्प्यावर वेतन निश्चित करण्यात येईल.<br>२. रोजंदार गट-२ मध्ये काम करणारे कर्मचारी दि.१.४.९६ रोजी किंवा तद्नंतर नियमित वेतन श्रेणीत सामावून घेतल्यास आणि त्यांचे मूळ वेतन त्या पदावरील सुधारित वेतन श्रेणीच्या कमाल टप्प्याच्या पुढे गेल्यास आवश्यक तेवढया तदर्थ वेतन वाढी मंजूर करुन समय वेतन श्रेणीवरील त्यांचे वेतन निश्चित करण्यात येईल.<br>३. ज्या रोजंदार गट-१ व २ अथवा अंशाकालीन कर्मचा-यांना दि.३१.३.९६ रोजी संरक्षित दैनिक वेतन मिळत होते, ते त्या ठिकाणी कार्यरत असेपर्यंत तसेच पुढे १.४.९६ पासून देय राहील. तसेच अशा कर्मचा-यास समय वेतन श्रेणीत सामावून घेतल्यास दैनिक संरक्षित वेतनाचे मासिक संरक्षित वेतनात रुपांतर करण्यात येईल. सदरच्या रकमेस २४८ या गुणांकाने भागून व १०० या गुणांकाने गुणून येणारी रक्कम मूळ वेतनात समाविष्ट करुन समय श्रेणीवरील पदात वेतन निश्चिती करण्यात येईल व मासीक संरक्षित वेतनाची उर्वरीत रक्कम संरक्षित महागाई भत्ता म्हणून अनुज्ञेय राहील.<br>क) दिनांक १.४.९६ पासून सर्व रोजंदार कर्मचा-यांचे वेतन दर खालील प्रमाणे परिगणीत करण्यात येईल.<br>दिनांक ३१.३.९६ रोजीच्या वेतन श्रेणीतील किमान टप्प्यावरील मूळ वेतन किंवा ३१.३.९६ रोजीचे मूळ वेतन |



३८

| अ.क्र. | मागणी | समझोता ५ |
|---|---|---|
| | | अधिक महागाई भत्ता अधिक घर भाडे भत्ता अधिक स्थानिक पूरक भत्त्याच्या बेरजेस २६ दिवसाने भागून रोजंदारी दर निश्चित करण्यात येईल.<br>ड) रोजंदार गट-२ मधील कर्मचा-यास १.४.९६ पासून विद्यमान सूचनांनुसार वार्षिक वेतनवाढ देय झाली असेल तेव्हा ती दैनिक दर परिगणीत करतांना विचारात घेण्यात येईल.<br>इ) दि.३१.३.९६ रोजी सेवेत असलेल्या अंशकालीन कर्मचा--यांचे बाबतीत वरील ३-(अ) प्रमाणे त्यांचे वेतन दर सुधारण्यात येतील व त्यांना त्याचे कामाचे तासाप्रमाणे फरक अनुज्ञेय राहील. |
| (४) | कराराच्यापोटी देय होणारी थकबाकी | महामंडळाची आर्थिक स्थिती अतिशय बिकट असल्यामुळे करारापोटी देय होणारी थकबाकीची रक्कम आजमितीस अदा करणे शक्य नाही. दिनांक १ एप्रिल १९९६ पासून करारापोटी देय होणा-या थकबाकीबाबत मान्यताप्राप्त संघटनेशी एक महिन्याच्या आत स्वतंत्रपणे निर्णयाबाबत चर्चा करण्यात येईल. |
| (५) | कर्मचा-यांची पंचवार्षिक बचत ठेव योजना | कर्मचा-यांच्या नवीन पंचवार्षिक बचत ठेव योजनेबाबत मान्यताप्राप्त संघटनेशी चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल. |
| (६) | विशेष वेतन | १. दि.१.४.९६ पासून आगारात काम करणारे सहा. वाह. अधिक्षक/ वाहतूक निरीक्षक/ सहा.वाह.निरीक्षक /वाहतूक नियंत्रक/ कारकून/ कनिष्ठ सहाय्यक/ लेखाकार इत्यादी कर्मचा-यांना जास्तीत जास्त रु.१५०/- दरमहा विशेष वेतन मिळत आहे ते यापुढेही चालू राहील.<br>२. ज्यांना कारखान्याच्या तासाप्रमाणे काम करावे लागते असे विभागीय कार्यशाळा/ मध्यवर्ती कार्यशाळा येथील कारकूनी कर्मचारीवर्ग व समय लेखापाल तसेच विभागीय भांडार/ मध्यवर्ती कार्यशाळेतील सहाय्यक भांडारपाल यांना रु.१५०/- दरमहा विशेष वेतन मिळत आहे ते यापुढेही चालू राहील. |
| (७) | वार्षिक वेतन वाढ | दि.१ एप्रिल १९९६ रोजी व तद्नंतर देय होणारी वार्षिक वेतनवाढ सुधारित वेतनश्रेणीत त्यांच्या नियत तारखेस (वेतन वाढीबाबत शिक्षा झालेली प्रकरणे वगळून) देय राहील. तसेच जे कर्मचारी दि.१.४.१९९६ रोजी किंवा त्यानंतर वेतनश्रेणीच्या कमाल टप्प्यावर अथवा कमाल टप्प्याच्या पुढे पोहोचतील ते देखील त्यांच्या वेतन वाढीच्या शेवटच्या दराने दरवर्षी एक वार्षिक तदर्थ वेतनवाढीस ३१.३.२००० पर्यंत पात्र राहतील. |
| (८) | (अ) महागाई भत्ता | दि.१.४.१९९६ पासून तृतीय व चतुर्थ श्रेणीतील कर्मचा-यांना राज्य शासनाने वेळोवेळी जाहिर केलेल्या नियम व दरानुसार महागाई भत्ता |

38

| अ.क्र. | मागणी | समझोता |
|---|---|---|
| | (ब) संरक्षित महागाई भत्ता | अनुज्ञेय राहील.<br>१. ज्या कर्मचा-यांना ३१.३.९६ रोजी सन १९८९ च्या करारानुसार मिळत असलेला संरक्षित महागाई भत्ता प्रत्यक्ष मिळत होता त्यांच्या बाबतीत तो विशेष वेतन अनुज्ञेय असलेल्या कामाच्या ठिकाणी कार्यरत असेपर्यंत प्रचलित नियमानुसार चालू राहील.<br>२. ज्या कर्मचा-यांना ३१.३.९६ रोजी विशेष वेतन मिळत होते. त्या विशेष वेतनावर त्यांना त्या दिवशी मिळत असलेला महागाई भत्ता जास्तीत जास्त रुपये २२२/- इतकी रक्कम १.४.९६ पासून त्या कर्मचा-यास संरक्षित महागाई भत्ता म्हणून देय राहील. तथापि, दि.१.४.९६ ते ३०.९.९९ पर्यंत विशेष वेतनावर जुन्या दराने अदा केलेल्या महागाई भत्त्याची वसूली केली जाणार नाही व विशेष वेतनावर दि.१.१०.९९ पासून महागाई भत्ता अनुज्ञेय राहणार नाही. सदरचा संरक्षित महागाई भत्ता तो कर्मचारी विशेष वेतन अनुज्ञेय असलेल्या कामाच्या ठिकाणी किंवा त्या पदावर कार्यरत असेपर्यंत देय राहील.<br>३. कर्मचा-यांना सन १९८९ च्या करारानुसार मिळत असलेला संरक्षित महागाई भत्ता व या करारानुसार अनुज्ञेय होणारा संरक्षित महागाई भत्ता हा वेतन बिलात स्वतंत्रपणे दाखविण्यात येईल. |
| (९) | घर भाडे भत्ता व स्थानिक पुरक भत्ता | शासनाने विहीत केलेल्या अटी, नियम व दरानुसार कर्मचा-यास घरभाडे भत्ता व स्थानिक पूरक भत्ता अनुज्ञेय राहील. |
| (१०) | अतिकालीक भत्ता, प्रोत्साहन भत्ता, प्रवास, बदली भत्ता, सामान बांधणी भत्ता (पॅकींग अलांऊन्स) | नमुद केलेल्या भत्त्याचे दि.३०.९.९९ पर्यंतच्या कालावधीकरिताचे दावे जुन्या दरानेच अनुज्ञेय राहतील. म्हणजेच सुधारित दराने फरक देय राहणार नाही. |
| (११) | दि.१.४.१९८८ च्या करारातील त्रुटी दूर करण्याबाबत.<br>(अ) कांही प्रवर्गातील वरच्या पदाच्या वेतन श्रेणीतील वार्षिक वेतन वाढीचा दर हा खालच्या प्रवर्गातील वार्षिक वेतन वाढीच्या दरापेक्षा कमी आहे. ही विसंगती दूर करण्यात यावी. | १९८९ च्या करारातील त्रुटी / विसंगती दूर करण्याचे मान्य केले. तथापि, त्या विसंगती दि.१.४.९६ पासून दूर करण्यात येतील. मात्र त्याबाबत दि.३१.३.९६ पूर्वीचा आर्थिक लाभ दिला जाणार नाही. |

| अ.क्र. | मागणी | समझोता ७ |
|---|---|---|
| | करतांना सेवा जेष्ठ कर्मचा-याचे वेतन सेवा कनिष्ठ कर्मचा-याच्या वेतनापेक्षा कमी झाले आहे. सदर विसंगती दूर करण्यात यावी. | दि.३१.३.९६ पूर्वीचा आर्थिक लाभ दिला जाणार नाही. |
| (१२) | इतर भत्ते | |
| | १. मार्ग भत्ता | चालक/वाहकाच्या प्रत्यक्ष कामासाठी (स्टेअरिंग व कंडक्टीग डयुटी) खालीलप्रमाणे मार्ग भत्ता अदा करण्यात येईल. सदर भत्ता दि.१.४.१९९६ पासून अदा करण्यात येईल.<br>१५० कि.मी.पर्यंत - रु.४.०० दर दिवशी<br>१५१ कि.मी. ते २०० कि.मी.पर्यंत - रु.०.०९ प्रति कि.मी.<br>२०१ कि.मी. ते २२५ कि.मी.पर्यंत - रु.०.१५ प्रति कि.मी.<br>२२५ कि.मी. च्या पुढे - रु.०.२० प्रति कि.मी. |
| | २. शहर वाहतूकीसाठी मार्ग भत्ता | शहर वाहतूक सेवेत काम करणा-या चालक/वाहकांना (स्टेअरींग व कंडक्टीग डयुटी) खालीलप्रमाणे मार्ग भत्ता दि.१.४.१९९६ पासून अदा करण्यात येईल.<br>६० कि.मी पर्यंत - रु. ४.०० दर दिवशी<br>६० कि.मी.पेक्षा जास्त - रु. ०.१२ प्रति कि.मी. |
| | ३. रात्रवस्ती भत्ता | चालक-वाहकांना खालीलप्रमाणे रात्रवस्ती भत्ता दि.१.४.१९९६ पासून अदा करण्यात येईल.<br>सर्वसाधारण ठिकाणी - रु. ६.०० दर रात्रवस्ती मुक्कामाला<br>जिल्हयाच्या ठिकाणी - रु. ७.०० दर रात्रवस्ती मुक्कामाला<br>विनिर्दिष्ट ठिकाणी - रु. ९.५० दर रात्रवस्ती मुक्कामाला |
| | ४. (अ) खोळंबा भत्ता व अधिक काल मुक्कामासाठी रात्रवस्ती भत्ता<br><br>(ब) रात्र वाहतूक सेवा भत्ता | (अ) जेथे नियत कर्तव्यामुळे चालक/वाहकांना रात्र वस्तीच्या ठिकाणी तेथे पोहोचण्याच्या वेळेपासून १८.०० तास किंवा त्यापेक्षा अधिक अखंड मुक्काम करणे आवश्यक ठरते अशा ठिकाणासाठी खालीलप्रमाणे खोळंबा भत्ता (रात्रवस्ती भत्ता) दि.१.४.९६ पासून अदा केला जाईल.<br>ठिकाण — सध्याचा दर — सुधारित दर<br>सर्वसाधारण ठिकाणी — रु.६.०० — रु.७.००<br>जिल्हयाच्या ठिकाणी — रु.७.०० — रु.८.००<br>विनिर्दिष्ट ठिकाणी — रु.८.०० — रु.९.५०<br>(ब) रात्र वाहतूक सेवा भत्ता प्रत्येक रात्रीसाठी रु.७.०० या दराने अदा केला जाईल. या भत्त्यासाठी शर्ती सध्या असल्याप्रमाणे म्हणजेच परिपत्रक क्र.एसटी/पीडी/६२/एनस/३/७० दिनांक |

| अ.क्र. | मागणी | समझोता |
|---|---|---|
| | | ३.९.७० जोडपत्र "इ" नुसार असतील व हा भत्ता दि.१.४.९६ पासून अदा केला जाईल. |
| | ५. रात्रपाळी भत्ता | जेथे कर्मचा-यांना २१.०० वाजल्यापासून ०६.०० वाजेपर्यंत किमान तीन तास काम करावे लागेल तेथे अशा कर्मचा-यांना प्रति रात्रपाळी कामासाठी रु.०७.०० या दराने आणि २१.०० वाजल्यापासून ०६.०० वाजेपर्यंत किमान ५ तास काम करावे लागते अशा कर्मचा-यांना रु.०८.५० या दराने रात्रपाळी भत्ता दिनांक १.४.९६ पासून अदा करण्यात येईल. |
| | ६. दुमजली बसगाडया / जोडगाडयां यांसाठी भत्ता | दुमजली व जोडगाडया चालविण्यासाठी दररोज रु.३.५० या दराने भत्ता दि.१.४.९६ पासून अदा करण्यात येईल. |
| | ७. पार्सल भत्ता | वाहकांना ज्या दिवशी पार्सले घेऊन जावे लागतील त्यासाठी त्यांना रु.२.०० या दराने पार्सल भत्ता दि.१.४.९६ पासून अदा करण्यात येईल. |
| | ८. टपाल भत्ता | वाहकांना ज्या दिवशी टपालाच्या थैल्या घेऊन जाव्या लागतील त्या दिवसासाठी रु.२.०० या दराने भत्ता दि.१.४.९६ पासून अदा करण्यात येईल. |
| | ९. धुलाई भत्ता | (अ) जे सुती गणवेष मिळण्यास पात्र आहेत अशा प्रवर्गांना सुती गणवेषासाठी दरमहा रु.६.०० या दराने धुलाई भत्ता अदा करण्यात येतो. त्याऐवजी रु.०७.०० या दराने दि.१.४.९६ पासून अदा करण्यात येईल.<br>(ब) टेरीकॉट गणवेषासाठी धुलाई भत्ता अदा केला जाणार नाही.<br>(क) वुलन गणवेषासाठी रु.१२.०० या वार्षिक दराने धुलाईभत्ता अदा करण्यात येईल व वुलन जर्सीसाठी रु.०९.०० या वार्षिक दराने धुलाई भत्ता दि.१.४.९६ पासून अदा करण्यात येईल. |
| | १०. शिलाई भत्ता | सुती गणवेषाच्या शिलाई आकारास दर संचास रु.१२.०० या दराने शिलाई आकार अदा करण्यात येतो. त्याऐवजी रु.१४.०० या दराने दि.१.४.९६ पासून अदा करण्यात येईल. |
| | ११. खानसामा व आतिथ्यालय परीचर | खानसामा व आतिथ्यालय परीचर यांना दरमहा रु.६०.०० या दराने विशेष भत्ता दि.१.४.९६ पासून अदा करण्यात येईल. |
| | १२. बिघाड दुरुस्ती भत्ता | बिघाड दुरुस्ती भत्ता रु.६.०० या दराने दि.१.४.९६ पासून अदा करण्यात येईल. |

९

| अ.क्र. | मागणी | समझोता |
|---|---|---|
| | १३. यंत्र भत्ता | दूरमुद्रक, दुरध्वनी चालक, लिफ्टचालक, चक्रमुद्रण, यंत्रचालक, फ्रँकिंग यंत्र चालक, अमोनिया मुद्रण यंत्र चालक यांना रुपये २०.०० या दराने दरमहा अदा करण्यात येईल. तसेच पत्ता यंत्र चालक ( अड्रेमा), छिद्रांक टंकक, छिद्रांक पडताळक यांना रु.२५.०० दरमहा या दराने भत्ता अदा करण्यात येईल व यंत्रगणक (कॉम्प्टिस्ट) यांना रु.३५.०० दरमहा या दराने भत्ता दि.१.४.९६ पासून अदा करण्यात येईल. |
| | १४. वाहन भत्ता | सुरक्षा पर्यवेक्षक/ राखण व पहारा निरीक्षक यांना दरमहा रु.२५.०० या दराने व कनिष्ठ सुरक्षा पर्यवेक्षक यांना रु.२०.०० (दरमहा) वाहन भत्ता दि.१.४.९६ पासून अदा करण्यात येईल. |
| | १५. इमान विम्याच्या – बदल्यात कारकून/आरक्षण वाहतूक नियंत्रक / रोकड हाताळणारे वाहतूक नियंत्रक यांना रोकड भत्ता देण्यात यावा. | रोकड हाताळणारे कारकून / आरक्षण वाहतूक नियंत्रक / रोकड हाताळणारे वाहतूक नियंत्रक यांना दि.१.४.९६ पासून रोकड भत्ता खालील दराने अदा करण्यात येईल.<br>इमान विम्याची रक्कम — रोकड हाताळण्याचा दर<br>रु.५०००/- — रु.३०/- दरमहा<br>रु.१००००/- — रु.३५/- दरमहा<br>रु.१५०००/- — रु.५०/- दरमहा<br>इमान विम्याचा हप्ता महामंडळ सोसिल. |
| | १६. आदिवासी भत्ता | राज्य शासनाच्या नियमाच्या धर्तीवर शासनाने ठरवून दिलेल्या दराने आदिवासी भत्ता अदा करण्यात येईल. |
| | १७. रोकड हाताळणी भत्ता | मध्यवर्ती कार्यालय/ प्रादेशिक कार्यालये/ विभागीय कार्यालये व मध्यवर्ती कार्यशाळा येथील सहाय्यक रोखपालास दरमहा रु.४०.०० या दराने दि.१.४.९६ पासून रोकड हाताळणी भत्ता अदा करण्यात येईल. मात्र इमान विम्याचा हप्ता महामंडळ सोशिल. |
| | १८. विशेष वेतन | दि.१.४.९६ पासून खालील कर्मचा-यांना विशेष वेतन अदा करण्यात येईल.<br>वरिष्ठ रोखपाल ( मध्यवर्ती कार्यालय ) — रु.५०/- दरमहा<br>मध्यवर्ती भांडार / विभागीय कार्यालयातील वरिष्ठ रोखपाल — रु.३५/- दरमहा<br>मध्यवर्ती कार्यशाळेतील दोन रोखपाल — रु.३५/- दरमहा<br>कनिष्ठ सुरक्षा पर्यवेक्षक/ सुरक्षा पर्यवेक्षक / राखण व पहारा निरीक्षक — रु.३५/- दरमहा<br>वरिष्ठ संगणक चालक — रु.७०/- दरमहा<br>कनिष्ठ संगणक चालक — रु.४०/- दरमहा |

10

| अ.क्र. | मागणी | समझोता |
|---|---|---|
| | १९. वैद्यकीय भत्ता | ज्या कर्मचा-यांनी वैद्यकीय भत्त्याचा पर्याय स्वीकारला आहे त्यांना दि.१.४.९६ पासून दरमहा रु.३५/- वैद्यकीय भत्ता अदा करण्यात येतो तो तसाच चालू राहील.<br>नविन सेवेत लागणा-या कर्मचा-यांच्या बाबतीत वैद्यकीय भत्ता किंवा वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीचा पर्याय स्वीकारण्यांची मुभा राहील. ज्या कर्मचा-यांनी वैद्यकीय प्रतिपूर्तीचा पर्याय स्वीकरलेला आहे, किंवा स्वीकारतील अशा कर्मचा-यांना वैद्यकीय भत्त्याचा पर्याय स्वीकारता येणार नाही.<br>रुग्णालयीन उपचारासहीत वैद्यकीय प्रतिपूर्तीची योजना अधिक व्यापक केल्याच्या परिणामी कर्मचा-यांना वैद्यकीय भत्त्याऐवजी वैद्यकीय सवलतीचा पर्याय स्वेच्छेने निवडण्याची मुभा देण्यात येईल. |
| | २०. यात्रा भत्ता | प्रतिदिनी रु.४.०० या दराने यात्रा भत्ता अदा करण्यात येईल. सदर भत्ता अदा करण्याविषयी मुंबई रा.प.कर्मचा-यांच्या सेवेसंबंधी विनियम १४६, १४७ च्या अधिन अदा करण्यात येईल. |
| | २१. दुर्गम भत्ता / पाणी भत्ता/ वाईट हवामान भत्ता | दुर्गम भत्ता / पाणी भत्ता/ वाईट हवामान भत्ता शासनाच्या नियमाप्रमाणे अदा करण्यात येईल. |
| | २२. अतिकालीक भत्ता | प्रशासनाने विहित केलेल्या नेहमीच्या कामाच्या तासापलिकडे जेव्हां जेव्हां कर्मचा-याला जादा काम करावे लागेल. तेव्हा त्याला विद्यमान समझोत्याच्या तरतूदी किंवा कायद्यातील तरतूदी यापैकी कर्मचा-याला जे फायद्याचे असेल त्यानुसार अतिकालीक भत्ता अदा करण्यात येईल. |
| | २३. आठवडा सुट्टी व नऊ तासाची विश्रांती बुडाल्या बद्दल द्यावयाचा अतिकालीक भत्ता | अ) जेथे अतिकालीक काम अंतर्भूत आहे. परंतु ९ तासाची विश्रांती बुडालेली नाही अशा प्रकरणी ८ तासापेक्षा वा १२ तास विस्तारित कामापेक्षा अधिक कामाबद्दल अतिकालीक वेतन मोटार वाहतूक कामगार नियम १९६१ मधील कलम १३ च्या दुस-या परंतुकामध्ये उल्लेख केलेल्या प्रकरणी सर्वसाधारण वेतनाच्या दीडपट दराने आणि मोटार वाहतूक कामगार अधिनियम १९६१ च्या कलम १३ च्या पहिल्या परंतुकात उल्लेख केल्या प्रकरणी सर्वसाधारण वेतनाच्या दुप्पट दराने देण्यात येईल.<br>ब) जेथे कांही अतिकालीक काम अंतर्भूत नाही. परंतु ९ तासाची विश्रांती बुडाली आहे अशा प्रकरणी बुडालेल्या विश्रांतीच्या प्रत्येक तासाला सर्वसाधारण वेतनाच्या दुप्पट दराने भरपाई देण्यात येईल.<br>क) जेथे अतिकालीक काम अंतर्भूत आहे व ९ तासाची विश्रांतीही बुडालेली आहे अशा प्रकरणी वरील (अ) प्रमाणे अतिकालीक वेतन अधिक विश्रांतीच्या बुडालेल्या प्रत्येक तासाला सर्वसाधारण वेतनाच्या दराने भरपाई देण्यात येईल. |

38

11

| अ.क्र. | मागणी | समझोता |
|---|---|---|
| | | ड) ९ तासाच्या विश्रांतीनंतर प्रत्यक्ष किती तास बुडाले, याचा हिशेब आठवड्याच्या तत्वावर व अतिकालीक तासाचा हिशेब सद्याप्रमाणे ठेवण्यात येईल. अतिकालीक वेतनाची व ९ तासाची विश्रांती बुडाल्यामुळे भरपाईची रक्कम मासिक वेतनाबरोबर दिली जाईल. |
| (१३) | वेतन देणे | वेतन प्रदान अधिनियम १९३६ च्या तरतुदीनुसार वेतन अदा करण्यात येईल. तसेच प्रवास भत्ता / अतिकालीक भत्ता संबंधित कर्मचा-याने लेखी माहिती भरुन दिल्यास एक महिन्याच्या आत अदा करण्यात येईल. |
| (१४) | वेतनातून वजाती | वेतन प्रदान अधिनियम,१९३६ व त्यांचे नियम आणि किमान वेतन अधिनियम, १९४८ व त्याचे नियम यास अनुसरुन कमाईतून वजाती केल्या जातील. |
| (१५) | (अ) उत्सव अग्रिम<br><br>(ब) रा.प. कर्मचा-यास स्कुटर/ मोटरसायकल व लुना खरेदी करण्यासाठी अग्रिम देण्यात यावा. | (अ) सध्या रा.प.कर्मचा-यांना वर्षातून एकदा उत्सव अग्रिम रु.४००/- देण्यात येतो. यापुढे राज्य शासनाच्या धर्तीवर उत्सव अग्रिम अदा करण्यात येईल व सदर उत्सव अग्रिमाची वसूली समान १० हप्त्यात करण्यात येईल.<br>(ब) रा.प.कर्मचा-यास स्कुटर/मोटरसायकल व लुना खरेदी करण्यासाठी राज्य शासनाच्या नियमानुसार निधीच्या उपलब्धतेनुसार अग्रिम अदा करण्यात येईल व त्याची वसुली शासनाच्या नियमाप्रमाणे करण्यात येईल. |
| (१६) | घरबांधणी अग्रिम | (अ) घरबांधणी अग्रिम राज्य शासनाच्या नियमाप्रमाणे अदा करण्यात येईल.<br>(ब) रोजंदार गट-२ मध्ये काम करणारे कर्मचारी समयवेतन श्रेणीत आल्यानंतर त्यांची रोजंदारी गट-२ मधील निम्मी सेवा घरबांधणी अग्रिम मंजूर करताना ५ वर्षाच्या कालावधीसाठी अंतर्भूत करण्यात येईल.<br>(क) घरबांधणीसाठी देण्यात येणारा जामीनदार हा समय वेतन श्रेणीवर असलेला वा एका टप्प्याने खाली किंवा एका टप्प्याने वर असलेला कोणत्याही पदावर काम करणारा असला तरी जामीनदार म्हणून ग्राहय धरण्यात येईल. परंतु तो घरबांधणी अग्रिम व त्यावरील व्याज परतफेडीच्या तारखेनंतर सेवानिवृत्त होणारा असावा.<br>(ड) सदर अग्रिमाची परतफेड करण्यासाठी जे हप्ते ठरवून दिलेले आहेत. त्यापेक्षा कमी हप्त्यामध्ये सदरची रक्कम परतफेड करण्यासाठी त्या कर्मचा-यांना मुभा देण्यात येईल. |

34

| अ.क्र. | मागणी | समझोता  |
|---|---|---|
| (१७) | पूरग्रस्त व नैसर्गिक आपत्ती | पूरग्रस्त व नैसर्गिक आपत्तीग्रस्त कामगारांना शासन ज्या सवलती देतील त्या सवलती रा.प.कर्मचा-यांना देण्यात येतील. नैसर्गिक आपत्तीत सापडलेल्या कर्मचा-यांना एक महिन्याचा मूळ पगार अधिक महागाई भत्ता एवढा अग्रिम मंजूर करण्यात येईल व तो तीन महिन्यात वसूल करण्यात येईल. नैसर्गिक आपत्तीत पूर / वादळ / भूकंप / आग/ वीज कोसळणे आणि अतिवृष्टीं इ.चा अंतर्भाव असेल. |
| (१८) | कायदेविषयक अग्रिम | चालक / वाहक नियमित कर्तव्यावर असताना जर त्यांचेकडून अपघात झाल्यास व संबंधितांवर न्यायालयात खटला दाखल झाल्यास रु.१५००/- अग्रिम देण्यात येईल. त्याची वसूली रुपये१५० प्रमाणे समान दहा हप्त्यात करण्यात येईल. |
| (१९) | कायदेविषयक सहाय्य | अ) आपले कर्तव्य पालन करीत असताना एखाद्या प्रसंगी जर तो (प्रसंग) त्याच्या नियंत्रणाबाहेर असेल किंवा त्याच्यावर परिस्थितीने लादला गेला असेल तर रा.प. कर्मचा-यावर अपराधी म्हणून खटला भरला गेल्यास त्यांना कायदेविषयक सहाय्य देण्याची तरतूद केली जाईल.<br>ब) कर्मचा-यांचा दोष नव्हता असे जर सक्षम प्राधिका-यांपुढे साधार असल्याचे दाखवून दिले, तर अशा प्रकरणी प्राधिका-याने कोणताही दंड इत्यादी पैसे देण्यासंबंधी शिक्षा लादली , तर ती राज्य परिवहनाने सोसावी. |
| (२०) | रजा वेतन अग्रिम | रजेवर जाण्यापूर्वी मागणी केल्यास कामगारांना रजा वेतन अग्रिम आगाऊ देण्यात येईल. |
| (२१) | १. श्रेणीकरण | (अ) १. ४४००-१५०-६५००-१७५-७५५०-१८५-९४००-१९५-१०३७५<br>आणि<br>२. ४५००-१७५-७३००-१८५-८२२५-१९५-१०९५५<br>या श्रेणीमधील कामगार खेरीज करुन जे इतर कर्मचारी त्याच्या विद्यमान श्रेणीमध्ये १२ वर्षाची अखंड व समाधानकारक सेवापूर्ण करतात अशा सर्वांना निकट वरच्या बढतीच्या पदाची वेतनश्रेणीदेण्यात येईल. एखाद्या विशिष्ट प्रवर्गासाठी जेथे निकट वरचे बढतीचेपद नसेल तेथे कर्मचा-यांच्या अशा प्रवर्गाची वरची वेतनश्रेणी जोडपत्र "ब" मध्ये दाखविल्याप्रमाणे असेल.<br>**टिपा :-** सदर खंडाच्या प्रयोजनार्थ समाधानकारक सेवा याचा अर्थ ज्या कर्मचा-याला खालीलपैकी कोणतीही एक किंवा अधिक शिक्षा देण्यात आलेली नाही अशी सेवा, असा होईल.<br>१) अ) पूर्वी केव्हाही घडलेली बडतर्फी , सेवामुक्ती किंवा सेवेतून काढून टाकणे, तथापि कोणाही कर्मचा-याला सेवेच्या |

336

| अ.क्र. | मागणी | समझोता १३ |
|---|---|---|
| | | सातत्यासहीत त्याच्या पदावर पुनःस्थापित केले तर अशी बडतर्फी, सेवामुक्ती किंवा सेवेतून काढून टाकणे यापूर्वीची, त्याची तो सेवेत नसलेल्या कालावधीसहीत सेवा १२ वर्षांची सेवा मोजण्याच्या प्रयोजनार्थ हिशोबात घेतली जाईल. कर्मचा-याला त्याची सेवामुक्ती, बडतर्फी किंवा सेवेतून काढून टाकणे यानंतर पुन्हा नोकरी / नेमणूक दिली तर त्या प्रकरणी या खंडाच्या प्रयोजनार्थ त्याची सेवा अशा पुन्हा नोकरीच्या पुर्ननेमणूकीच्या तारखेपासून सुरु होईल.<br>ब) तीन वर्षापेक्षा अधिक नाही त्या कालावधीसाठी बढती थांबविणे.<br>२) (अ) वरची श्रेणी मिळविण्यासाठी पात्र होण्याकरीता संबंधित कर्मचा-याला तो ज्या तारखेस १२ वर्षांची सेवा पूर्ण करतो त्याच्या निकट पूर्वीच्या ३ वर्षात दरवर्षी सरासरी २४० दिवस उपस्थिती ठेवली असली पाहिजे.<br>(ब) २४० दिवसांच्या उपस्थितीची गणना करण्याच्या प्रयोजनार्थ मध्यवर्ती कार्यालय व प्रादेशिक कार्यालय कर्मचारीवर्गासाठी वर्षातील अधिकृत रजा असणारे २४ शानिवार आणि त्या कर्मचा-याने खालील प्रयोजनार्थ उपभोगलेली रजा उपस्थिती समजण्यात येईल.<br>१. मुंबई रा.प.कर्मचारी सेवा विनियमान्वये विकलांगता रजा.<br>२. क्षयरोग, कर्करोग, कुष्ठरोग व अर्धांगवायू यांनी ग्रस्त कर्मचा-याला मंजूर केलेली विशेष रजा.<br>३. जो अन्यथा उच्चतर श्रेणीसाठी पात्र असेल अशा कर्मचा-याचा निलंबनाधीन उपस्थितीचा कालावधी<br>४. प्रशिक्षण / प्रशिक्षणासाठी प्रतिनियुक्ती प्रशासनाच्या सांगण्यावरुन वैद्यकीय तपासणी.<br>५. कर्तव्य म्हणून गणली गेली असेल तेव्हा महामंडळाच्या प्रयोजनार्थ न्यायालयातील उपस्थिती.<br>६. कुटूंब नियोजन कार्यक्रमान्वये कर्मचा-याला मंजूर केलेली विशेष रजा.<br>७. कामगार शिक्षण योजनेमध्ये सहभागी झालेल्या कर्मचा-यांना औद्योगीक दौ-यासाठी मंजूर केलेली विशेष रजा.<br>८. रोजंदारी गट २ (तात्पुरती समय वेतनश्रेणी) मधील अखंड व समाधानकारक सेवेचा कालावधी<br>९. स्त्री कर्मचा-यांच्या बाबतीत तिने उपभोगलेली बाळंतपणाची विशेष रजा उपस्थिती म्हणून समजण्यात येईल.<br>(ब) वर नमूद केलेल्या वरच्या श्रेणीतील वेतन निश्चिती खालच्या श्रेणीत एक वेतनवाढ न देता करण्यात येईल. |

38

१५

| अ.क्र. | मागणी | समझोता |
|---|---|---|
| | | (क) जेथे तत्सम टप्पा नसेल तेथे वेतन त्यापुढील वरच्या टप्प्यावर आणि तंतोतंत तत्सम टप्प्याच्या प्रकरणी पुढील वरच्या टप्प्यावर निश्चित करण्यात येईल.<br>(ड) वरिल -अ मध्ये समावेश होणा-या कर्मचा-याची नवीन श्रेणीतील वेतनवाढीची तारीख त्याच्या खालच्या श्रेणीतील नेहमीची वेतनवाढीची तारीख असेल.<br>इ) चालक व मदतनीस आणि कार्यशाळेतील सहा. कारागीर, कारागिर "क" यांची विद्यमान निवड श्रेणीची योजना कार्यान्वित राहील आणि त्यांचा वरील योजनेत समावेश होणार नाही.<br>(ई) ज्या दिवशी कर्मचारी निवड श्रेणीस पात्र असेल त्या दिवसापासून त्यास निवड श्रेणी देण्यात येईल, मात्र संबंधीत कर्मचा-याने ग्रेडेशन टेस्ट पास केली पाहिजे. तसेच ग्रेडेशनची परिक्षा वेळेवर घेण्यात येईल. |
| | २. कर्मचा-यांची वार्षिक वेतनवाढ व निवडश्रेणी एकाच तारखेस येत असेल तर अशा कर्मचा-यांना वार्षिक वेतनवाढ देऊन निवड श्रेणीत वेतन निश्चित करावे. | १. कर्मचा-याची वार्षिक वेतनवाढ व निवडश्रेणी एकाच तारखेस येत असेल तर अशा कर्मचा-यांना वार्षिक वेतनवाढ प्रथम देऊन नंतर निवडश्रेणीतील योग्य त्या टप्प्यावर वेतन निश्चित करण्यात येईल.<br>२. याशिवाय जे कर्मचारी निवडश्रेणीसाठी पात्र ठरतील अशा कर्मचा-यांची वार्षिक वेतनवाढ निवडश्रेणीच्या तारखेनंतर दोन महिन्यापर्यंत येत असेल तर अशा कर्मचा-यांना प्रथम वार्षिक वेतनवाढ देऊन निवडश्रेणीच्या योग्य त्या टप्प्यावर वेतन निश्चिती करण्यात येईल. |
| | ३. तात्पुरत्या बढतीचा कालावधी निवडश्रेणी देताना ग्राहय धरण्यात यावा. | तात्पुरत्या बढतीचा कालावधी निवडश्रेणी मंजूर करताना ग्राहय धरण्यात येईल. तसेच एखादा कर्मचारी तात्पुरत्या बढतीवर असताना त्याच पदावर नियमित पदोन्नत झाला असेल अशा कर्मचा-यांच्या बाबतीत तात्पुरत्या बढतीचा कालावधी वरच्या पदाची निवडश्रेणी मंजूर करताना ग्राहय धरण्यात येईल. |
| | ४. पदावनत केलेल्या कर्मचा-यांचा बढतीवरील सेवाकाळ निवड श्रेणी देताना ग्राहय धरण्यात यावा. | बढतीवर काम करताना कर्मचारी परिविक्षा कालावधीत पदावनत झाल्यास परिविक्षा कालावधी व मूळ सेवा काळ निवडश्रेणीसाठी विचारात घेण्यात येईल. तसेच एखादया कर्मचा-यास शिस्त व आवेदन पद्धतीखाली पदावनत केल्यास सदर कर्मचा-यांचा पदावनत काळ वगळून मागील मूळ पदाची सेवा विचारात घेऊन निवड श्रेणी देण्यात येईल. |
| | ५. स्वच्छक या पदावर काम करणा-या कर्मचा-यांना मदतनीसाची निवड श्रेणी देण्यात यावी. | स्वच्छक या पदावरील कर्मचा-यांना निकटच्या वरच्या श्रेणीतील निवड श्रेणीस विहित शर्ती व अटीच्या अधीन राहून ७ वर्षानंतर देण्यात येईल. |

| अ.क्र. | मागणी | समझोता |
|---|---|---|
| (२२) | १. रजा | अ) प्रमुख यांत्रिकांच्या श्रेणीखाली सर्व कार्यशाळा कर्मचारीवर्ग, सर्व वाहतूक कर्मचारीवर्ग, चालक / वाहक / मदतनीस /इशाराकार / सहा.वाह .निरीक्षकांच्या श्रेणीखाली पर्यवेक्षकीय कर्मचारी वगळता महामंडळातील सर्व उर्वरित कर्मचा-यांना मुंबई राज्य परिवहन सेवेसंबंधी नियमामध्ये केलेल्या तरतुदींनुसार रजा देण्यात येते. सदर सेवा विनियमातील रजेबाबतच्या तरतुदी राज्य शासनाच्या नियमाच्या धर्तीवर आधारीत असून ते महामंडळाच्या कर्मचा-यांना लागू करण्यात येतील.<br>ब). चालक/ वाहक/ मदतनीस/ ईशाराकार/ प्रमुख यांत्रिकांच्या श्रेणीखालील सर्व कार्यशाळा कर्मचारी सहा.वाह. निरीक्षकाच्या श्रेणीखालील सर्व पर्यवेक्षकीय.कर्मचारी यांना खालीलप्रमाणे रजा देण्यात येईल.<br>१. प्रत्येक कॅलेंडर वर्षात ४० दिवस पगारी रजा देण्यात येईल. त्यापैकी निम्मी रजा कामगाराने दरवर्षी मंदीच्या मोसमात घेणे आवश्यक असल्याचे स्थानिक प्रशासनाने सुचना फलकावर नोटीस लावून कळविले व त्यास रजेवर जाण्यासाठी मुक्त केले तर तसे करणे त्याच्यावर (कामगारावर) बंधनकारक राहील. उरलेली रजा त्यास त्याच्या पसंतीनुसार उपभोगता येईल.<br>२. तसेच आजारीपणात ४० दिवसापैकी १० दिवस पूर्ण पगारी रजेऐवजी २० दिवसांची अर्धपगारी रजा बदलून घेण्याची कामगारांना मोकळीक राहील. ही देवाणघेवाण एकाच हप्त्यात केली जाईल.<br>परंतु रजेचा कालावधी या कालावधीत येणा-या कोणत्याही सुट्टीच्या दिवसासह असेल .<br>३. रोजंदार गट-१ व गट-२ वर काम करणा-या कर्मचा-यांना सद्या ज्या प्रमाणे रजा देण्यात येते ती तशीच यापुढेही देण्यात येईल. |
| | २. प्रमुख कारागीरांना रजा | प्रशासकीय कर्मचारी वर्गाला लागू असलेले रजेचे नियम प्रमुख कारागीरांना लागू राहतील. |
| | ३. रजा साठविण्याची मर्यादा | सर्व कर्मचा-यांना २४० दिवसापर्यंत रजा साठविण्याची मर्यादा राहील. |
| | ४. नाकारलेल्या रजेचे रोखीकरण | जर कर्मचा-याने सरासरी वेतनावरील रजेसाठी अर्ज केला व अशी रजा प्रशासनाने कोणत्याही कारणासाठी नाकारली आणि अशा नाकारण्याचा परिणाम त्याच्या खाती विहित मर्यादेपलीकडे रजा साठविल्यामुळे ती वाया गेली तर अशा कर्मचा-याला व्यपगत (lapse) रजेच्या कालावधीसाठी सरासरी वेतन देण्यात येईल. |
| | ५. बाळंतपणाची रजा | बाळंतपणासाठी रजा शासनाच्या धर्तीवर व शासन वेळोवेळी बदल/ सुधारणा करेल त्याप्रमाणे देण्यात येईल. |

| अ.क्र. | मागणी | समझोता |
| --- | --- | --- |
| | ६. रजेचे रोखीत रुपांतर | रजेचे रोख रकमेत रुपांतर करण्यासाठी कामगार आता ३० दिवसाऐवजी किमान १५ दिवसांची सरासरी वेतनावरील रजा उपभोगील. |
| | ७. भ्रमिष्ट झालेल्या कर्मचा-याला विशेष रजा | सेवेत असताना जर एखाद्या कर्मचा-याला वेडयाच्या इस्पितळात दाखल केले असेल व सक्षम डॉक्टरने तसा दाखला दिला असेल तर त्याला आवश्यकतेनुसार विशेष विकलांगता रजा मंजूर करण्यात येईल. परंतु ती कोणत्याही परिस्थितीत ४ महिन्यापेक्षा जास्त असणार नाही. |
| | ८. विकलांगता रजा मंजूर करण्यासाठी असलेल्या कडक शर्थी काढून टाकणे. | ज्या प्रकरणामध्ये खास विकलांगता रजेचा समावेश आहे.त्याबाबत असे मान्य करण्यात आले की, अपघातानंतर व्यवस्थापनाने कर्मचा-याला ज्या रुग्णालयात / दवाखान्यात दाखल केले असेल त्याचा दाखला विकलांगता रजा मंजूर करण्यासाठी ग्राहय धरण्याबाबत विचार करण्यात येईल. याबाबत जिल्हा शल्य चिकित्सक किंवा मानसेवी वैद्यकीय अधिकारी यांचा दाखला सादर करण्याचा आग्रह धरण्यात येणार नाही. |
| | ९. अ) सेवासमाप्ती नंतर द्यावयाची रजा<br><br>ब) सेवा निवृत्तीचे लाभ | मृत / निवृत्त / राजीनामा दिलेल्या / बडतर्फ / सेवामुक्त केलेल्या / स्वेच्छानिवृत्ती घेतलेल्या कर्मचा-यांच्या किंवा ज्या कर्मचा-यांची सेवा वैद्यकीय कारणासाठी समाप्त केली असेल अशा कर्मचा-यांच्या रजा खात्यामध्ये न उपभोगलेली अर्जित रजा व वैद्यकीय कारणासाठी अर्धसरासरी वेतनावरील रजा जमा करण्याबाबत निरनिराळया लागू होणा-या कायद्याच्या तरतुदीचे संबंधीत कायद्यान्वये अनुज्ञेय रजेच्या मर्यादेपर्यंत पालन केले जाईल. सदर रजेचे रोखीत रुपांतर करण्यात येईल.<br><br>एखाद्या कर्मचा-याची ३० वर्षाची सेवा झाली आहे किंवा वयाची ५० वर्षे पूर्ण झाली आहेत, त्याला स्वेच्छेने सेवा निवृत्त झाल्याच्या तारखेस देय असलेले निवृत्तीचे लाभ देऊन स्वेच्छेने निवृत्त होण्यास मुभा देण्यात यावी. |
| | १०. वैद्यकीय कारणादाखल रजा मंजूर करणे | वैद्यकीय कारणावरील रजा सामान्यतः नाकारण्यात येणार नाही. तथापि ती नाकारणे अटळ ठरले तर संबंधित कर्मचा-यांच्या प्रकरणी अशी रजा नाकारण्यापूर्वी ती प्रकरणे अभिप्रायासाठी, प्रकरणपरत्वे मुख्य मानसेवी वैद्यकीय अधिकारी / मानसेवी वैद्यकीय अधिकारी यांच्याकडे पाठविण्यात येतील. |
| | ११. निवृत्तीच्या वेळी अर्धवेतनी रजेचे रोख रकमेत रुपांतर | राज्य शासन जशी व जेव्हा ही सुविधा त्याच्या कर्मचा-यांना लागू करील तशी महामंडळसुद्धा आपल्या कर्मचा-यांना ती लागू करेल. |
| | १२. क्रिडा स्पर्धामध्ये सहभागी झालेल्या रा.प. | अधिकृत क्रिडा स्पर्धामध्ये भाग घेण्यासाठी रा.प.प्राधिका-यांनी ज्या कर्मचा-याला अधिकृत केले आहे.त्याला अशा क्रिडा स्पर्धामध्ये खेळताना |

| अ.क्र. | मागणी | समझोता |
|---|---|---|
| | कर्मचा-यांना इजा झाल्यास विशेष रजा व वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती | इजा झाल्यास तो विशेष विकलांगता रजेसाठी हक्कदार होईल. ही विकलांगता रजा, प्रकरणपरत्वे, महामंडळाचे मुख्य मानसेवी वैद्यकीय अधिकारी / मानसेवी वैद्यकीय अधिकारी यांनी प्रमाणित करावी लागेल. तसेच असा कर्मचारी, जरी त्याने वैद्यकीय भत्त्यांचा पर्याय निवडलेला असला तरी वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या फायद्यासाठी हक्कदार असेल. |
| | १३. आठवडा व पगारी सुट्टीची भरपाई सुट्टी व पगारी सुट्टया बुडाल्यास त्याचे रोख रकमेत/अर्जित रजेत रोख रुपांतर करणेबाबत. | ज्या कॅलेंडर महिन्यात साप्ताहिक सुट्टया व पगारी सुट्टया मिळालेल्या नसतील, तो महिना संपल्यानंतरच्या दोन महिन्यांत भरपाई सुट्टया देण्यात येतील. नाहीतर त्या ज्या महिन्यात मिळालेल्या नसतील तो महिना संपल्यानंतर तिस-या महिन्यामध्ये कर्मचारी त्यांच्या पसंती प्रमाणे त्या घेण्यास स्वतंत्र राहील.<br>पगारी सुट्टया त्या-त्या कर्मचा-याला वर निर्देशीत केल्याप्रमाणे दिल्या पाहिजेत. परंतु अशा सुट्टया व्यवस्थापन देऊ शकले नाही तर त्या कॅलेंडर वर्ष संपेपर्यत देण्याचा प्रयत्न करण्यात येईल. पण व्यवस्थापन कॅलेंडर वर्ष संपेपर्यत सुट्टया देऊ शकले नाही, तर अशा रद्द झालेल्या प्रगारी सुट्टयांची भरपाई म्हणून कर्मचा-याच्या अर्जित रजेमध्ये रुपांतर करुन देण्यात येईल. |
| | १४. ज्या कर्मचा-यांना त्यांचे मुख्यालयाचे बाहेर कर्तव्यावर पाठविले जाते अशा कर्मचा-यांच्या आठवडा सुट्टया आल्या तर त्या रद्द समजण्यात याव्यात. | आठवडा सुट्टी नियमाप्रमाणे देण्यात येईल. |
| (२३) | कार्यशाळा कामगाराप्रमाणे स्वच्छक व प्रिंटींग प्रेसमध्ये काम करणा-या सर्व कामगारांना रजा न उपभोगता रजा विकण्याची (इन्कॅशमेंट) मुभा देण्यात यावी. | स्वच्छक व मुद्रणालयातील काम करणा-या कर्मचा-यांना कार्यशाळा कामगाराप्रमाणे रजा न उपभोगता रजा विकण्याची (इन्कॅशमेंट) मुभा देण्यात येईल. |
| (२४) | रजेच्या कार्डाचा पुरवठा करणे | कर्मचा-यांना रजेच्या कार्डाचा पुरवठा करण्यात येईल. |
| (२५) | चालक-वाहकांचा रजेचा कोटा ठरवितांना आगारात नेमलेल्या एकूण चालक--वाहकांच्या संख्येवर ठरविण्यात यावा. तसेच पगारी सुट्टी, विशेष रजा, वैद्यकीय रजा इ. सदर कोटयात धरु नये. | सद्या जो १.३३ रजेचा कोटा आहे. त्याऐवजी १.४० असा रजेचा कोटा निश्चित केला आहे व तशा प्रशासकीय परिपत्रकीय सूचना प्रसृत करण्यात आलेल्या आहेत. (कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.९/९९, दि.२६.४.९९) |

| अ.क्र. | मागणी | समझोता १८ |
|---|---|---|
| (२६) | १. गणवेष व बुट | १. नियोजित तारखेस गणवेष पुरविण्याचे सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील.<br>२. टेरीकॉट गणवेषासाठी हकदार असणा-या कर्मचा-यांना दरवर्षी गणवेषाचे संच पुरविण्यात येतील. साधारणतः दोन गणवेषाच्या संचासाठी पाच मीटर टेरीकॉटचे कापड देण्यात येईल.<br>दोन गणवेषासाठी देण्यात आलेले ५ मीटर कापड कमी पडत असल्यास कर्मचा-याच्या त्याच्या वैयक्तिक मोजमापानुसार टेरीकॉट कापड देण्यात येईल.<br>३. संबंधित कर्मचारी शिलाईचा खर्च सोसतील.<br>४. टेरीकॉट कपडयासाठी हकदार असणा-या कर्मचा-यास धुलाई भत्ता अदा केला जाणार नाही. |
| | (अ) कर्मचा-यांचा गणवेष | महिला / शिपाई / सफाईगार / स्वच्छक यांना दरवर्षी नायलॉनच्या तीन साडया व तीन ब्लाऊज पीसेस देण्यात येतील. सदर साडया , ब्लाऊज पिस विभागीय / घटक पातळीवर स्थानिक खरेदी करण्यात येईल. ब्लाऊज शिलाई भत्ता अदा करण्यात येणार नाही व तसेच साडी व ब्लाऊजसाठी धुलाई भत्ता अदा केला जाणार नाही.<br>सफाईगारांना प्रत्येक ३ वर्षातून एकदा एक रेनकोट व गमबुटांची एक जोडी पुरविण्यात येईल.<br>महिला शिपाई, महिला सफाईगार यांना प्रत्येक ३ वर्षातून एकदा "स्त्रियांच्या छत्र्या" व "स्त्रियांच्या उलन जर्सी पुरविण्यात येतील. |
| | (ब) डंग-या | कार्यशाळा प्रवर्ग / मुद्रणालय कर्मचारीवर्ग (कारकूनवर्गीय कर्मचारी वगळून), मजदूर , स्वच्छक व देखभाल पथकात काम करणारे कर्मचारी यांना अर्ध्या बाहयाच्या व उघडया गळयाच्या तीन डंग-या दरवर्षी विनामुल्य पुरविण्यात येतील. वीजतंत्री व लोहार यांना चार डंग-या पुरविण्यात येतील. |
| | (क) कार्यशाळा कर्मचा-यांचे बुट / गमबुट / विजेरी (टॉर्च) आणि काठी. | १. कार्यशाळा प्रवर्ग, मुद्रणालय कर्मचारीवर्ग (कारकूनवर्गीय कर्मचारी वगळून) व टायर पुनःस्तरण सयंत्र कर्मचारीवर्ग यांना प्रत्येक वर्षी एक बुटाची जोडी पुरविण्यात येईल. तसेच इंधन लिपिकांना कार्यशाळा कर्मचा-याप्रमाणे बुट पुरविले जातील. स्वच्छक कर्मचा-यांना गमबुटाची एक जोडी व स्त्री स्वच्छकांना पी.व्ही.सी.सॅंडल / चप्पल दरवर्षी पुरविण्यात येईल.<br>२. अ) शिपाई, नाईक व हवालदार या प्रवर्गातील कर्मचा-यांना कार्यशाळा कर्मचा-याप्रमाणे बूटाचा एक जोड व त्याच प्रवर्गातील स्त्री कर्मचा-यांना एक जोड चप्पल देण्यात येईल.<br>ब) सुरक्षा रक्षकांना टॉर्च, टॉर्चेस सेल व काठीचा पुरवठा करण्यात येईल. |

336

17

| अ.क्र. | मागणी | समझोता |
|---|---|---|
| | | ३. आगार / कार्यशाळा यांचेशी संबंधित ज्या सुरक्षा रक्षकासहीत कामगारांना रात्री काम करावे लागते व पावसाळ्यात व अन्य मोसमात जेथे सरपटणा-या प्राण्यांचा सुळसुळाट आहे. त्या ठिकाणी धोक्यापासून असंरक्षित असणा-या कर्मचा-यांना मान्यताप्राप्त संघटनेशी विचार विनिमय करुन महामंडळ ठरविल अशा ठिकाणी गमबुट देण्यात येतील.<br>४. कार्यकारी अभियंता-मुंबई, उप अभियंता-ठाणे, रायगड,रत्नागिरी, सिंधुदूर्ग, पालघर यांच्या कार्यालयातील कर्मचा-यांनापावसाळी मोसमात नियोजित कामासाठी पुरेशा संख्येने गमबुट देण्यात येतील. |
| | २. आगारातील कर्मचा-यांना सामाईक रेनकोट / गमबुटाचा पुरवठा | आगारातील ज्या कर्मचा-यांना पावसात कामासाठी बाहेर जावे लागते अशा कर्मचा-यांच्या उपयोगासाठी काही पावसाळी कोटांचे (रेनकोटाचे ) व गमबुटाचे संच डेपोमध्ये सामाईक संच म्हणून ठेवण्यात येतील. छपरीच्या बाहेर कामासाठी जावे लागणा-या कर्मचा-यांची संख्या लक्षात घेऊन जेथे पुष्कळ पाऊस पडतो अशा विभागातील / कार्यालयातील प्रत्यक्ष आवश्यकतेचा आकडा काढून त्यानुसार समाईक संचामध्ये ठेवावयाच्या संख्येमध्ये उचित वाढ करण्यात येईल. |
| | ३. रेनकोट | १. चालक / वाहक / वाहतूक नियंत्रक / सहा.वाह.निरीक्षक आणि सुरक्षा रक्षक यांना तीन वर्षातून एकदा विनामुल्य रेनकोटचा पुरवठा करण्यात येईल. तथापि जे कर्मचारी रेनकोटसाठी पात्र नाहीत अशा कर्मचा-यांच्या वापरासाठी प्रत्येक घटक / कार्यालयात पुरेशा संख्येत रेनकोट ठेवण्यात येतील.<br>२. पावसाळ्यात बिघाड दुरुस्तीसाठी जाणा-या कर्मचा-यासाठी रेनकोट उपलब्ध करुन देण्यात येईल.<br>ब) रेनकोटची मुदत संपल्यानंतर ते परत करावे लागणार नाहीत.<br>क) सफाई कामगारास एक रेनकोट व एक गमबुटाची जोडी तीन वर्षातून एकदा देण्यात येईल. |
| | ४. गरम कपडे (गणवेष) | चालक / वाहक / वाहतूक नियंत्रक / सहा.वाह.निरीक्षक / वाहतूक निरीक्षक/ पहारेकरी व सफाईगार यांना तीन वर्षातून एकदा वुलन गणवेष विनामुल्य देण्यात येईल. सुरक्षा रक्षकांना वुलन गणवेषाऐवजी वुलन ओव्हरकोट तीन वर्षातून एकदा विनामुल्य देण्यात येईल. |
| | ५, वुलन जर्सी | अ) वाहतूक नियंत्रक / वाह.निरीक्षक व सफाई कामगारांना तीन वर्षातून एकदा वुलन जर्सी देण्यात येईल.<br>ब) कार्यशाळेतील कारखान्याचे कर्मचारी, चपराशी (शिपाई), नाईक, हवालदार आणि लिफ्टचालक यांना चार वर्षातून एकदा विनामुल्य वुलन जर्सी पुरविण्यात येईल. |

| अ.क्र. | मागणी | समझोता |
|---|---|---|
| | | क) महिला शिपाई , महिला सफाईगार यांना तीन वर्षातून एकदा वुलन जर्सी आणि छत्री देण्यात येईल. |
| | ६. मलवस्त्रे (अॅप्रॉन) | अ) मध्यवर्ती भांडार , कुर्ला भांडार, विभागीय भांडार /डेपो भांडार अशा भांडार आस्थापनांच्या केवळ आवक व जावक उपशाखेमध्ये काम करणा-या कर्मचा-यांना आणि विभागीय कार्यशाळा यामध्ये काम करणा-या व भांडार सामान प्रत्यक्ष हाताळणा-या भांडार कारकुनांना मलवस्त्रे (निळ्या रंगाची ) देण्यात येतील. याशिवाय असेही मान्य करण्यात आले की, डेपोमध्ये इंधन हाताळणा-या कामगारांना मलवस्त्रे पुरविण्यात येतील.<br>ब) घटकातील इंधन लिपिक व भांडार लिपिक यांच्या वापरासाठी दोन मलवस्त्रे ठेवण्यात येतील.<br>क) मिश्रकांना दरवर्षी दोन मलवस्त्रे देण्यात येतील. |
| | ७. गणवेष पुरविण्याची तारीख | अ) नियोजित तारखेस गणवेष पुरविण्याचे प्रयत्न करण्यात येतील. गणवेष दिल्याची तारीख कोणतीही असली तरी गणवेष पात्रतेच्या नियोजित तारखेत बदल होणार नाही.<br>ब) कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यास वैद्यकीय कारणास्तव शारिरिक दृष्टया कामास अपात्र ठरल्यास किंवा सेवेत असताना मृत्यू पावल्यास गणवेष परत घेतला जाणार नाही किंवा अंतिम देयकातून त्याची वसूली केली जाणार नाही. |
| (२७) | वाहकांना रोकड ठेवण्याची पिशवी पुरविणे | प्रत्येक वाहकाला दर तीन वर्षानी किंवा निरुपयोगी झाल्याचे आढळल्यास त्यापूर्वी रोकड ठेवण्याची एक पिशवी पुरविण्यात येईल. हेच नियम पंच व ट्रे याबाबतीत लागू आहेत. |
| (२८) | कामाचे तास | १) मोटार ट्रान्स्पोर्ट वर्कर्स् अॅक्ट १९६१ च्या तरतुदी लागू असलेल्या कर्मचा-यांचे कामाचे तास या कायद्याच्या तरतुदीनुसार खालीलप्रमाणे राहतील.<br>अ. मार्गावरील व वाहतूक स्थानावरील वाहतूक कर्मचारी वर्गाचे कामाचे नेहमीचे तास दिवशी ८ तास असतील व आठवड्याचे तास ४८ राहतील. जरुर पडल्यास सणांच्या उत्सव व इतर प्रसंगी मोटर ट्रान्सपोर्ट वर्कर्स अॅक्टमधील प्राधिका-याने निर्देशित केल्यास त्यांचे रोजचे कामाचे तास ८ तासापेक्षा अधिक व आठवडयात ४८ तासापेक्षा जास्त राहतील. परंतु कोणत्याहीं परिस्थितीत दिवसाला १० तास आणि आठवडयांचे ५४ तासापेक्षा अधिक असणार नाहीत. |

| अ.क्र. | मागणी | समझोता  |
| --- | --- | --- |
| | | ब. विस्तारित तास (स्प्रेड ओव्हर) :- विस्तारित तास हे दर दिवशी १२ तास इतके राहतील. विस्तारित तास या संज्ञेची व्याख्या मोटार परिवहन कामगार अधिनियम १९६१ मध्ये नमुद केलेल्याप्रमाणे राहील.<br>क. आगारातील क्रु डयुटी नियतांपैकी ३३.३३ क्रु नियतांच्या विस्तारित कालावधीत १२ तासापेक्षा जास्त होत असेल तर, मान्यता प्राप्त संघटनेबरोबर विचार विनिमय करण्यात येईल.<br>ड. जर दैनिक विस्तारित कालावधी १२ तासापेक्षा जास्त होत असेल तर त्या दिवशी १२ तासापेक्षा अधिक कालावधीसाठी (महागाई भत्ता धरुन) सामान्य वेतनाच्या दुप्पट दराने अतिकालीक भत्त्याच्या धर्तीवर विशेष भत्ता देण्यात येईल.<br>इ. जर विस्तारित कालावधी आठवडयात ७२ तासाहून अधिक झाला तर महागाई भत्ता धरुन सामान्य वेतनाच्या दुप्पट दराने अतिकालीक भत्त्याच्या धर्तीवर विशेष भत्ता देण्यात येईल.<br>ई. प्रशासकीय कार्यालयाचे कामाचे तास आठवडयाला ४० तास राहतील. |
| (२९) | अतिरिक्त कामे | जेव्हां एखादया वाहनावरील कर्मचारी नियत कार्य संपवून डेपोवर किंवा स्टँडवर पोचतो तेव्हां त्याचे दिवसाचे कामाचे तास पूर्ण होताच त्याला तात्काळ कार्यमुक्त करण्यात येईल व डेपोत किंवा स्टँडवर दिवसाच्या नियतकार्याचे विस्तारीत तास पूर्ण होण्यासाठी त्यांना थांबवून ठेवण्यात येणार नाही. |
| (३०) | रात्रवस्ती | एकेरी रात्रवस्तीवरुन परतणारे व दुस-या दिवशी साप्ताहिक सुट्टीवर जाणारे चालक/वाहक साप्ताहिक सुट्टीच्या दुस-या दिवशी ८ तासाच्या कामासाठी उपलब्ध असतील. साप्ताहिक सुट्टीच्या दुस-या दिवशी चालक/ वाहक नेहमीच्या पूर्ण कामासाठी उपलब्ध राहतील. |
| (३१) | दुहेरी रात्रवस्ती | निरनिराळ्या ठिकाणी लागोपाठ दोनपेक्षा जास्त रात्रवस्त्या असू नयेत. निरनिराळ्या ठिकाणी लागोपाठ दुहेरी रात्रवस्त्या असल्यास त्यांची टक्केवारी नियतांच्या ५ टक्क्यापेक्षा अधिक असु नये. या टक्केवारीत कोणतीही वाढ करावयाची असल्यास ती मान्यताप्राप्त संघटनेशी विचार विनिमय करुन करण्यात येईल. |
| (३२) | चालक/ वाहकांना जेवणाची विश्रांती | नियत कार्यात दर दिवशी चालकांना व वाहकांना पूर्ण ३० मिनीटे जेवणाची विश्रांती देण्यात येईल. |

38

22



| अ.क्र. | मागणी | समझोता |
|---|---|---|
| (३३) | डेपो पातळीवर २४००० कि.मी. तपासणी करण्याची पद्धत काढून टाकणे | व्यवस्थापनाच्या सध्याच्या प्रतिबंधात्मक देखभाल धोरणानुसार २४००० / ३०००० कि.मी.तपासणीचे काम विभागीय कार्यशाळेत करण्यात येते. तथापि अगदी अपवादात्मक प्रकरणीं फक्त आणीबाणीच्या वेळी व प्रवाशांच्या हितासाठी काही वेळा डेपोना हे काम करण्यास सांगावे लागते. यापुढे जेव्हां जेव्हां असा प्रसंग उद्भवेल त्यावेळी प्रशासन डेपो पातळीवर आवश्यक ती ज्यादा मदत देईल. |
| (३४) | पगारी सुट्‌ट्या | १. चालक/ वाहक / यांत्रिकी कर्मचारी वर्ग व कार्यशाळा डेपो आणि मुद्रणालय या ठिकाणी काम करणारे सर्व कर्मचारी वर्षातून १० पगारी सुट्‌ट्यांचे हक्कदार असतील. या १० पैकी दोन सुट्‌ट्या २६ जानेवारी व १५ ऑगस्ट या राहतील. उरलेल्या सुट्‌ट्या जेथे कार्यसमित्या विद्यमान असतील तेथे त्यांचेशी विचार विनिमय करुन आणि जेथे त्या नसतील त्या ठिकाणी मान्यताप्राप्त संघटनेशी विचारविनिमय करुन विभाग / घटक प्रमुख निश्चित करतील.<br>२. जर एखादी पगारी सुट्टी कर्मचा-याच्या आठवडा सुट्टीच्या दिवशी येत असेल तर अशा कर्मचा-यांना अतिरिक्त भरपाई सुट्टी देण्यात येईल. |
| (३५) | चालक-वाहक नियोजित कर्तव्यावर असतांना कोणत्याही कारणास्तव नियत रद्द झाल्यास त्यांना सदर दिवसाची हजेरी देण्यात यावी. रोजंदार गट-२ वरील कामगारांना वरील बाब लागू करण्यात यावी. | प्रचलित पध्दत चालू ठेवावी. जे समय वेतन श्रेणीवर आहेत त्यांना नियोजित डयुटी देण्यात यावी. तसेच रोजंदार गट-२ वरील कामगारांना कामगिरीवर बोलाविल्यानंतर त्याने सदर कामगिरीवर हजर राहूनही त्यास कामगिरी दिली नाही तर, त्याची त्या दिवसाची हजेरी लावण्यात यावी. |
| (३६) | कर्मचारी कामावर असताना इजा झाल्यास वैद्यकीय मदती व्यतिरिक्त यथोचित श्रमिक नुकसान भरपाई अदा करणे. | कामावर असताना झालेल्या इजाबदल कामगार नुकसान भरपाई अधिनियमातील तरतुदीनुसार जो अधिनियम लागू असेल तेथे भरपाई देण्यात येईल आणि कामगार नुकसान भरपाई अधिनियमाखाली अंतर्भूत न होणा-या कामगारांच्या प्रकरणी अशा धर्तीवर कार्यवाही करण्यात येईल. नुकसान भरपाई अदा करण्यात येईल. |
| (३७) | भविष्यनिर्वाह निधी | महामंडळातील कर्मचा-यांना भविष्यनिर्वाह निधीचे अंशदान व इतर फायदे भविष्यनिर्वाह निधी कायद्याच्या धर्तीवर देण्यात येतील. तसेच भविष्यनिर्वाह निधीच्या रकमांच्या गुंतवणूकीची पध्दत कायदे व नियमास वेळोवेळी होणा-या बदलासह चालू राहतील. |
| (३८) | उपदान | उपदान कायदा १९७१ च्या कायद्यातील तरतूदीनुसार उपदान लागू करण्यात येईल. |

| अ.क्र. | मागणी | समझोता २३ |
|---|---|---|
| | | जर कर्मचारी कामावर असताना अपघातात मृत्यू पावल्यास किंवा विकलांग झाल्यास उपदानाची रक्कम ही श्रमिक नुकसान भरपाई अधिनियम १९२३ नुसार देय होणा-या नुकसान भरपाई व्यतिरिक्त असेल. |
| (३९) | सानुग्रह अनुदान | बोनस देण्यासंबंधी अधिनियमाच्या धर्तीवर कर्मचा-यांना सानुग्रह रक्कम दिवाळीपूर्वी किमान १० दिवस अगोदर अदा करण्यात येईल.<br>जे कर्मचारी बोनस कायद्यातील तरतूदीनुसार सानुग्रह अनुदानास पात्र ठरणार नाहीत अशा कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान अदा करणेबाबत उत्पादकतेशी निगडीत ( Productivity linked Ex-Gratia ) अशी योजना मान्यताप्राप्त संघटनेबरोबर चर्चा करुन तीन महिन्यात बनविण्यात येईल. |
| (४०) | कायम पदांची घोषणा | समय वेतन श्रेणीतील पूर्ण वेळ पदापैकी आदमासे ७५ टक्के सरासरी एवढे पदे कायम करण्यात येतील व पदधारकांना या पदावर कायम नेमणूक करण्यात येईल. |
| (४१) | सेवानिवृत्तीचे वय | अ) तिस-या व चौथ्या वर्गातील कर्मचा-यांचे सेवा निवृत्तीचे वय ५८ वर्षे राहील.<br>ब) विदर्भातील प्रोव्हिन्सीयल ट्रान्सपोर्ट सर्व्हिस मधील १.१.१९५७ पूर्वी सेवेत लागलेल्या किंवा सरळ सेवेत बढती मिळालेल्या कर्मचा-यांच्या बाबतीत सेवा निवृत्तीचे वय ६० वर्षे राहील. |
| (४२) | नोकर कपात भरपाई | औद्योगीक विवाद अधिनियम १९४७ मधील तरतुदीनुसार प्रकरणपरत्वे नोकर कपाती भरपाई किंवा अपरिहार्य काम बंदी दाखल भरपाई अदा करण्यात येईल. ही भरपाई उपदानाच्या रकमे व्यतिरिक्त असेल. |
| (४३) | पावसाळ्यानंतरचे वेळापत्रक | ज्या व्यक्तींची प्रतिक्षा यादीमधून नेमणूक केली असेल आणि त्यांनी रजेतील किंवा नैमित्तिक रिक्त पदावर नव्हे, तर जादा नियतामुळे (शेडयुलमुळे) निर्माण झालेल्या रिक्त पदावर दोन लागोपाठच्या पावसाळ्यानंतरच्या वेळापत्रकाच्या कालावधीत किमान ६० दिवस पूर्ण केले असतील, अशा व्यक्तींची पावसाळी कालावधीत केवळ नियते कमी केल्यामुळे कपात करण्यात येणार नाही. |
| (४४) | सरळ सेवा प्रवेशाच्या क्षेत्रातील (डायरेक्ट सेक्टरमधील) कोणत्याही पदासाठी अर्ज करण्याची कर्मचा-याला मुभा देण्याची सुविधा. | सरळ सेवा प्रवेशाच्या कोणत्याही पदासाठी दिलेल्या जाहिरातीसाठी विहित अर्हता / आवश्यकता पूर्ण करणा-या कोणाही कर्मचा-याला त्या पदासाठी कोणत्याही वयोमर्यादेविना अर्ज करण्याचा हक्क राहील. |

| अ.क्र. | मागणी | समझोता |
|---|---|---|
| (४५) | राज्य परिवहन कर्मचा-यांच्या सेवानिवृत्ती नंतर, मृत्यूनंतर किंवाते विकलांग झाल्यास त्यांच्या मुलांना नोकरीमध्ये प्राधान्य | अ) याबाबत असे मान्य करण्यात आले की, निवृत्त झालेल्या/ निवृत्त होणा-या कर्मचा-याच्या एका मुलास घटक संवर्ग पदाच्या नोकरीमध्ये प्राधान्य देण्यात येईल. याबाबत प्रशासकीय सुचना पूर्वीच देण्यात आलेल्या आहेत व वेळोवेळी त्याचा पुनरुच्चार करण्यात येईल.<br>ब) राज्य शासनाने शासकीय कर्मचा-यांच्या मुला मुंलींच्याबाबत चतुर्थवर्ग पदामधील भरतीसाठी काही शर्ती शिथिल केल्या आहेत. व्यवस्थापन याबाबत शासनाने वेळोवेळी स्वीकारलेल्या धोरणांचे अनुसरण करु इच्छिते, आणि त्याबाबत आवश्यक ते प्रस्ताव महामंडळाला स्वतंत्रपणे सादर करण्यात येतील. |
| (४६) | वैद्यकीय दृष्टया अपात्र ठरलेल्या कर्मचा-यांना पर्यायी नोकरी | ज्यांना सेवेत असताना शारिरिक अपंगत्व आले आहे व वैद्यकीय दृष्टया अपात्र ठरविण्यात आले आहे. अशा कर्मचा-यांना पर्यायी नोकरी देऊन सेवेत ठेवण्याचे महामंडळाने यापूर्वीच ठरविले आहे. |
| (४७) | मध्यवर्ती कार्यशाळेत स्वच्छकाच्या जागा देण्यात याव्यात. | मध्यवर्ती कार्यशाळेत स्वच्छकाच्या जागेच्या आवश्यकतेची पडताळणी करण्यात येईल. |
| (४८) | कर्मचा-यांना पुनःस्थापित करण्यासंबंधी न्यायालयीन आदेशांची अंमलबजावणी करण्यास चुकणा-या संबंधित अधिका-यांकडून वसूली. | सक्षम न्यायालयाचा स्थगिती आदेश मिळवला नसेल तर सेवामुक्त/ बडतर्फ कर्मचा-याला पुनःस्थापित करण्याच्या प्रकरणी न्यायालयाच्या आदेशांची सदर न्यायालयाचा आदेश प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबत घटक कार्यालय/ विभाग प्रमुख काळजी घेतील. या संबंधित मान्यताप्राप्त कामगार संघटना/ कामगार न्यायालयीन आदेशांची अंमलबजावणी न झाल्याच्या प्रकरणी ती प्रकरणे संबंधित प्रदेश व्यवस्थापक व मुख्य कामगार अधिकारी यांचेकडे नेतील. |
| (४९) | कर्मचा-यांपैकी पती किंवा पत्नी एकाच शहरात वेगवेगळया खात्यात काम करीत असल्यास त्यांची बदली इतर ठिकाणी करु नये. | रा.प.महामंडळाच्या सेवेत पती / पत्नी काम करीत असल्यास त्यांना एकाच ठिकाणी ठेवण्यासाठी प्रशासकीय सोयीनुसार प्रयत्न केला जाईल. |
| (५०) | १८० दिवसांची सेवा पूर्ण झाल्यांनंतर रोजंदारी कर्मचा-यांना सामावून घेणे. | साप्ताहिक सुट्टया व इतर सुट्टयांसह १८० दिवस सातत्याने काम करणा-या कोणत्याही कर्मचा-याला वेतनाच्या समय श्रेणीवर खालील अटीच्या अधीन राहून समय वेतनश्रेणीवर घेण्यात येईल.<br>१) अशा कर्मचा-यांना सध्या प्रमाणेच म्हणजेच राज्य परिवहन सेवा मंडळाच्या निवड समितीने त्यांची निदान एकवेळ निवड करणे व रिकाम्या जागांची उपलब्धता यांच्या अधीन सामावून घेण्यात येईल. |

| अ.क्र. | मागणी | समझोता |
|---|---|---|
| | | २) यापूढे शक्यतो चालक प्रवर्गाखेरीज निवड समितीने निवड केल्याशिवाय कर्मचा-यांची नेमणूक केली जाणार नाही.<br>३) जे सामावून घेण्यास पात्र होते अशा रोजंदारांच्या मागील सर्व प्रकरणी, वैयक्तीक प्रकरणाचे गुणवत्तेनुसार व कायद्याच्या तरतुदीनुसार पुनःर्विलोकन करण्यात येईल.<br>४) ज्यादा कामगाराबाबत (उदा.पहारेकरी) विभागातून माहिती मागविण्यात येईल व सदर प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर ती महामंडळापुढे आदेशार्थ सादर करण्यात येतील. |
| (५१) | अर्धवेळ कर्मचा-यांना पूर्णवेळ तत्वावर सामावून घेणे. | अर्धवेळ कर्मचा-यांची ज्येष्ठता यादी तयार करण्यात येईल. त्यायोगे त्यांच पदावर त्यांची ज्येष्ठता व निश्चित पात्रता, त्याचप्रमाणे वैद्यकीय तपासणी, विहित शैक्षणिक अर्हता त्यांच्याकडे असणे व मुख्य म्हणजे त्यांच्यासाठी रिक्त जागा उपलब्ध असणे यानुसार विचार करणे सुलभ होईल. |
| (५२) | अर्धवेळ मिश्रकांना पूर्णवेळ तत्वावर सामावून घेणे. | जे अंशकालीन मिश्रक पूर्णकालीक जागेसाठी असलेल्या शैक्षणिक पात्रता व इतर पुर्तता पूर्ण करीत असतील त्यांचा पूर्ण कालीक कामगार म्हणून पूर्णकालीक जागांची उपलब्धता असल्यास सामावून घेण्यात येईल. |
| (५३) | प्रशिक्षणाच्या सोयी | शक्यतो प्रशिक्षणाच्या सोयी करण्यात येतील हे तत्वतः मान्य करण्यात आले. व्यवस्थापनाने एखाद्या व्यक्तीला कोणत्याही परीक्षेस बसण्याची परवानगी दिल्यास त्याला परिक्षेपूर्वी तीन आठवडयांची रजा देण्यात येईल. अशी परवानगी शक्यतो नाकारण्यात येणार नाही. |
| (५४) | शिपाई व तत्सम प्रवर्गातील तसेच इतर कर्मचा-यांना लिपिक पदी बढती देणेबाबत. | शिपाई / हवालदार / नाईक / लिप्टमन / परीचर / खानसामा/ आतिथ्यालय परिचर / मुकादम / सफाईगार / सुरक्षा रक्षक/ खलाशी/ स्वच्छक / माळी व इतर प्रवर्गातील कर्मचारी हे एस.एस.सी. अथवातत्सम परिक्षा उत्तीर्ण झाले असतील ते बढती साठी विहित केलेली नेहमीची चाचणी परिक्षा उत्तीर्ण झाले तर त्यांना लिपिकांच्या श्रेणीमध्ये बढती देण्यात येईल. |
| (५५) | कार्यशाळा कामगारांच्या बढती परिक्षा (ट्रेड टेस्ट) चाचणी घेण्यापूर्वी एक महिन्याचे प्रशिक्षणवर्ग घेण्यात यावेत. | इतर प्रवर्गाना जसे प्रशिक्षण दिले जाते. त्यानुसार तीन दिवसापर्यंत प्रशिक्षण देण्यात येईल. |
| (५६) | नविन प्रकारच्या पावर स्टेअरिंग व एअर ब्रेकच्या विशेष प्रशिक्षणासाठी कामगारांना पाठविण्यात यावे. | नविन प्रकारच्या पावर स्टेअरिंग व एअर ब्रेकच्या विशेष प्रशिक्षणासाठी कंपनीच्या कर्मचा-यांना बोलावून प्रशिक्षण देण्यात येईल. |

| अ.क्र. | मागणी | समझोता  |
|---|---|---|
| (५७) | बढती मिळालेल्या कर्मचा-यांचा परिविक्षा कालावधी रद्द करणे. | ज्या कर्मचा-यांना बढती दिली आहे त्यांचा एक वर्षाचा परिविक्षा कालावधी संपल्यानंतर त्यांना संबंधित खाते /शाखा घटक प्रमुखांच्या समाधानकारक सेवेच्या अधीन बढतीच्या पदावर स्थायी करण्यात येईल. जर एखाद्या कर्मचा-याचा परिवीक्षा कालावधी वाढविणे आवश्यक असल्यास त्यास तसे कळविण्यात येईल आणि परिवीक्षा कालावधी वाढविण्या संदर्भात ४ महिन्यापर्यंत तसे कळविले गेले नसल्यास तो त्या बढतीच्या पदावर स्थायी होईल. |
| (५८) | खात्यामार्फतची [illegible] ती एक वेळ नाकारली तर प्र[illegible]तिक्षा यादी संपल्यानंतर पुन्हा बढतीची संधी देण्यात यावी. | खात्यामार्फतची बढती कर्मचा-याने नाकारल्यास अशा कर्मचा-यांना निवड प्रतिक्षा यादी संपल्यानंतर जागा उपलब्ध झाल्यास फक्त एक वेळ बढतीची संधी देण्यात येईल. मात्र अशा कर्मचा-याने पुन्हा बढती नाकारल्यास तो कर्मचारी त्या पदाच्या ज्येष्ठता यादीत शेवटी येईल. |
| (५९) | खातेनिहाय चौकशी प्रलंबित असताना कर्मचा-यास बढती पासून वंचित करु नये. | केवळ संबंधित कर्मचा-याविरुद्ध खातेनिहाय चौकशी प्रलंबित आहे. म्हणून बढतीसाठी तयार करण्यात येणा-या निवड यादीवर घेण्यासाठी केवळ याच कारणासाठी कर्मचा-यास अपात्र ठरविता येणार नाही.<br>संबंधित कर्मचा-याची पात्रता व त्याचा विहित वार्षिक गोपनीय अहवाल विचारात घेऊन निवड यादी तयार करण्यात येईल.<br>अशा कर्मचा-याच्या बाबतीत सक्षम प्राधिकारी नेमणूक देताना खाते चौकशीमध्ये ठेवण्यात आलेले आरोप लक्षात घेऊन बढतीसाठी नेमणूक आदेश काढतील. |
| (६०) | गोपनीय अहवाल | असे मान्य करण्यात आले की, गोपनीय अहवालाद्वारे मुल्यमापनाची विद्यमान पद्धती कर्मचा-याला खात्याच्या परीक्षांना बसण्यास परवानगी देण्याच्या प्रयोजनापुरती रहावी. तथापि, एखादया कर्मचा-याला परीक्षेस बसण्याची परवानगी न देण्याच्या स्थानिक प्रशासनाच्या निर्णयाबाबत त्याचे समाधान झाले नाही तर त्या प्रकरणी तो आपले अभिवेदन प्रादेशिक व्यवस्थापकाकडे पाठवू शकेल. आणि कर्मचारी ज्या खात्याचा असेल त्या खात्याच्या त्यांच्या कार्यालयातील अधिका-यासमवेत प्रादेशिक व्यवस्थापक अभिवेदनावर परीक्षेपूर्वी निर्णय देईल. असे अभिवेदने मध्यवर्ती कार्यशाळेतील कर्मचा-यांच्या प्रकरणी उपमहा व्यवस्थापक (यं.अ.) यांच्याकडे आणि मध्यवर्ती भांडार, मध्यवती कार्यालय, प्रादेशिक कार्यालय व मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी येथील कर्मचा-यांच्या प्रकरणी उपमहा व्यवस्थापक (क.व औ.सं.) यांचेकडे विचारासाठी पाठवतील. |
| (६१) | वार्षिक गोपनीय अहवालातील प्रतिकूल शेरे काढण्यासाठी पुन:र्निरीक्षण. | वार्षिक गोपनीय अहवालातील प्रतिकूल शेरे काढून टाकण्यासाठी वरिष्ठ अधिका-याकडे शेरा प्राप्त झालेल्या तारखेपासून एक महिन्याच्या आत अर्ज करता येईल. वरिष्ठ अधिका-यांचा अशा अर्जावरील निर्णय अंतिम राहील. |

३८६

| अ.क्र. | मागणी | समझोता |
|---|---|---|
| (६२) | सेवा पुस्तिकेची दुसरी प्रत मिळणेबाबत. | सर्व कर्मचा-यांच्या सेवा पुस्तिका दोन प्रतीत तयार करण्यात येतील व त्यातील प्रमाणित सेवा पुस्तिकेची एक प्रत संबंधित कर्मचा-यास देण्यात येईल. कर्मचा-याकडे असलेल्या सेवा पुस्तिकेमध्ये नवीन नोंदी करुन घेण्यासाठी त्याने त्याच्याजवळ असलेले सेवापुस्तक वेळोवेळी व्यवस्थापनाकडे सादर करणे आवश्यक आहे. कर्मचा-यास देण्यात येणारी प्रत विनामुल्य राहील. मात्र प्रत हरवल्यास रु.१०/- भरुन दुसरी प्रत घ्यावी लागेल. |
| (६३) | कर्मचा-याची बढतीवरील बदली | प्रशासकीय औचित्याच्या कारणादाखल व्यवस्थापन बदली करेल. तथापि, नियम म्हणून व्यवस्थापनाने एका ठिकाणावरुन दुस-या ठिकाणी बढतीवर बदली करण्याची गरज नाही. |
| (६४) | बढतीनंतर कर्मचा-याचे प्रशिक्षण | निरनिराळ्या प्रवर्गातील कर्मचा-यासाठी व्यवस्थापन उजळणी, पाठ्यक्रमाची व्यवस्था करते . ही व्यवस्था यापुढेही चालू राहील. त्या व्यतिरिक्त बढतीवर असणा-या विभागीय प्रशिक्षण केंद्रावर उचित प्रशिक्षण देण्यात येईल. |
| (६५) | कामगाराची एका विभागातून दुस-या विभागात विनंतीवर बदली | एखाद्या घटक कार्यालयात/ विभागात रिक्त पद उद्भवल्यास आणि दुस-या विभातील एखाद्या कर्मचा-यास अशा विभागात/ घटक कार्यालयात बदली हवी असल्यास, जेथून त्याने बदली मागीतली आहे, त्या विभागातील कार्यालयीन कामाच्या निकडीच्या अधिनतेने त्याच्या बदलीबाबत अनुकूल विचार करण्यात येईल. म्हणजेच प्रशासन फक्त अशा कर्मचा-यांची बदली करील की, अशा बदलीमुळे मूळ विभागातील/ घटक कार्यालयातील कामावर प्रतिकूल परिणाम होणार नाही. |
| (६६) | घटक स्तरावरील कर्मचा-यांच्या एका विभागातून दुस-या विभागात बदल्या. | सर्वसाधारणपणे घटक स्तरावरील कर्मचा-यांच्या बदल्या अन्य विभागात करण्यात येणार नाहीत. खास बाब म्हणून बदली करावी लागली तर ज्येष्ठतेचा क्रम प्रत्येक प्रकरणी गुणवत्तेवर ठरविण्यात येईल. |
| (६७) | सुरक्षा पर्यवेक्षकांच्या बदल्याबाबत | सुरक्षा पर्यवेक्षकांच्या बदलीबाबत त्यांची सामान्यतः त्यांच्यासंबंधित प्रदेशाबाहेर बदली केली जाणार नाही. |
| (६८) | सहा महिन्यापेक्षा कमी कालावधीपेक्षा कोणत्याही तातुरत्या वा कायम बदल्या असू नयेत. बदल्या केवळ प्रशासकीय कारणासाठी वर्षातून एकदा कराव्यात. | बदल्यांचे प्रमाण कमीत कमी असण्याची जरुरी घटकांना (विभागांना / कार्यालयांना ) पटवून देण्यात येईल.तसेच शक्यतो अल्प मुदतीसाठी कोणत्याही कामगाराची बदली केली जाणार नाही. पावसाळ्यात नियतांची संख्या कमी झाल्यामुळे बदल्या केलेल्या कामगारांना नियतांची संख्या पूर्ववत होताच त्यांच्या मुळच्या ठिकाणी शक्यतो परत आणले जाईल. |
| (६९) | नोकरी संपण्यापूर्वी "काही मागणी नाही" हे प्रमाणपत्र देणे. | कर्मचा-यांची नोकरी संपल्यानंतर काही मागणी नाही हे प्रमाणपत्र त्वरेने देण्याबाबत व अंतिम देय रकमा त्वरीत चुकत्या करण्याबाबत व्यवस्थापन प्रयत्न करेल. |

| अ.क्र. | मागणी | समझोता |
|---|---|---|
| (७०) | लायसन्स फीच्या खर्चाची प्रतिपूर्ती | ज्यांचेकडे अवजड वाहन चालविण्याचे लायसन्स आहे व ज्यांना व्यवस्थापन अवजड वाहने चालविण्यास सांगेल अशा कार्यशाळा कर्मचा-याने जर लायसन फी व इतर अनुषंगिक खर्च केला असेल तर व्यवस्थापन त्यांची प्रतिपूर्ती करेल. |
| (७१) | शिस्त व अपिल कार्यपद्धतीत सुधारणा | शिस्त व अपिल कार्यपद्धतीसाठी विहित असलेल्या नियमामध्ये सुधारणा करण्याबाबत मान्यताप्राप्त संघटनेने केलेल्या सुचना संबंधात व्यवस्थापन व संघटना प्रतिनिधी यांची समिती नेमण्यात येईल. सदर समिती आपला अहवाल तीन महिन्याच्या आत महामंडळाला सादर करील. महामंडळाच्या मान्यतेनंतर यामध्ये अंतिम सुधारणा करण्यात येतील. |
| (७२) | खात्याच्या चौकशीच्या वेळेची गैरहजेरी | सध्याची पद्धत चालू राहील. म्हणजे ज्या आरोपी कर्मचा-यास खात्याच्या चौकशीसाठी हजर राहणे आवश्यक असेल तो जेवढा कालावधी तो खात्याच्या चौकशीमध्ये गुंतलेला असेल तोपर्यंत कामावर आहे असे समजले जाईल. तथापि आरोपी कर्मचा-याच्या वतीने प्रतिनिधीत्व युक्तीवाद करणारे सहकारी कर्मचारी, अथवा संघटनेचे प्रतिनिधी कामावर आहेत असे समजले जाणार नाही. |
| (७३) | चौकशीमध्ये संबंधीत अधिका-याने कायद्याच्या तरतुदीच्या नियमांचा किंवा मध्यवर्ती कार्यालयाने प्रसारित केलेल्या परिपत्रकांचा भंग केल्याचे सिध्द झाल्यास नियमानुसार कारवाई करण्यात येईल. | संघटनेने स्पष्ट उदाहरणे देऊन लेखी तक्रार सादर केल्यास व चौकशी अंती सक्षम प्राधिका-याने कायद्याच्या तरतुदीचा, नियमांचा किंवा मध्यवर्ती कार्यालयाने प्रसारित केलेल्या परिपत्रकाचा भंग केल्याचे सिध्द झाल्यास सदर सक्षम प्राधिका-यावर नियमानुसार कारवाई करण्यात येईल. |
| (७४) | कर्मचा-याच्या वेतनातून वसूली | कारणे दाखवा नोटीस दिल्याखेरीज व स्वतःच्या बाजू खुलासेवार मांडण्याची संधी दिल्याखेरीज एखाद्या कामगाराच्या कमाईतून कोणतीही वसुली केली जाणार नाही. |
| (७५) | चालकाकडून किरकोळ अपघात झाल्यास अशा चालकास प्रशिक्षणास पाठविण्यात येऊ नये. | सदरची मागणी मान्य करण्यात आली. |
| (७६) | वाहकाचा तिकीट ट्रे चोरीला गेल्यास अथवा तिकीट पुस्तक गहाळ झाल्यास अशा वाहकाकडून गहाळ झालेल्या संपूर्ण तिकीटाची रक्कम वसूल | प्रकरणाचे गांभीर्य पाहून किती किंमत वसूल करावी याचा निर्णय घेण्यात येईल. |

| अ.क्र. | मागणी | समझोता २९ |
|---|---|---|
| | केली जाते, ती पध्दत बंद करुन पूर्वीप्रमाणे गहाळ झालेल्या तिकीट पुस्तकाचा छपाई खर्च वसुल करण्यात यावा. | |
| (७७) | कर्तव्यावर जाताना प्रतिदिनी चालक व वाहकांना खाजगी रक्कम रु.१००/- ठेवण्याची मुभा देण्यात यावी. | चालक / वाहकांना कर्तव्यावर असताना सध्याच्या रु.५०/- इतक्या रकमेऐवजी रु.१००/- त्यांच्या दैनंदिन खर्चासाठी रक्कम ठेवण्याची मुभा राहील. |
| (७८) | खराब रस्त्यामुळे वाहनांच्या भागांची मोड-तुट, टायरची हानी यांच्या जबाबदारीतून चालकाला मुक्त करणे. | व्यवस्थापन हे तत्वतः स्वीकारीत आहे. आणि गुणावगुणानुसार प्रत्येक प्रकरण व्यवस्थापन विचारात घेईल. |
| (७९) | निनावी पत्रे | असे मान्य करण्यात आले की, तपासणी करण्याच्या योग्यतेच्या घटनांचा उल्लेख असलेल्या व ज्यांना तपासासाठी पुरेसे महत्व आहे. अशाच ठिकाणी पत्रांची दखल घेण्यात यावी. त्यामध्ये कपट (लबाडी), चोरी व नैतिक अधःपात अशा प्रकरणांचा समावेश असू शकेल. |
| (८०) | सर्व कार्यशाळा व आगार कार्यशाळेमध्ये अवजड वस्तुच्या चढ उतारासाठी इलेक्ट्रिक क्रेन उपलब्ध करुन द्यावे. | अवजड वस्तुच्या चढ उतारासाठी आवश्यक त्या ठिकाणी इलेक्ट्रिक क्रेन उपलब्ध करुन देण्यात येईल. |
| (८१) | सर्व टी.आर.पी. प्लॅन्टमधील बफिंग बिल्डींगमध्ये स्वच्छ हवेचा पुरवठा होईल अशी व्यवस्था करण्यात यावी. | सर्व टी.आर.पी.प्लॅन्टमधील बफिंग बिल्डींगमध्ये पुरेशा हवेची व्यवस्था करण्यात येईल. |
| (८२) | रोखपालासाठी पोलादी काऊंटरची तरतूद करणे | सर्व रोखपालांना काऊंटर पुरविण्यात येतील. मात्र ते पोलादी असतील असे नव्हे. |
| (८३) | प्रवास योग्य वाहने | योग्य स्थितीतील प्रवास योग्य वाहने चालकांना देण्यात येतील. परंतु ती तशी नसतील तर चालक त्यांच्या आक्षेपांची रोजनाम्यावर नोंद करील. आणि त्याने नमूद केलेल्या दोषामुळे दुर्घटना घडल्यास त्या योगे तो जबाबदारीतून मोकळा होईल. |
| (८४) | टपाल थैल्या नेण्यासाठी वेगळ्या कुलूपबंद व्यवस्थेची तरतूद | बसगाडयातून टपाल थैल्या नेण्यासाठी पुरेशा सुरक्षा व्यवस्थेची तरतूद करण्याकरीता मान्यताप्राप्त कामगार संघटनेच्या विचार विनिमयाने या समझोत्यावर सहया झाल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत काही उपाय शोधण्याचे प्रयत्न व्यवस्थापन करील. |

३४

| अ.क्र. | मागणी | समझोता |
|---|---|---|
| (८५) | टपाल थैल्या, जेवणाचे डबे, पार्सले इ.ची वाहतूक | अ) पार्सल, टपाल थैल्या व जेवण्याच्या डब्यांचा सुरक्षित ताबा यासंबंधी व्यवस्था करण्यात येईल.<br>ब) चालकाकडील हत्यार पेटीचा सांभाळ त्यांच्याकडून (वाहनाचा/ कामाचा) ताबा घेणारा दुसरा चालक करेल.जेव्हा त्याचे काम बदलते किंवा संपते तेव्हा त्याच्याकडून वाहनाचा ताबा घेणारी कार्यशाळेतील व्यक्ती करेल. मान्य केल्याप्रमाणे हत्यार पेटया वाहनामध्ये जोडून बसवेपर्यंत ही व्यवस्था चालू राहील. |
| (८६) | पुरेशी व आवश्यक उपसाधने (ॲडिक्वेट ॲसेसरीज) | कामगारांना त्यांची नेहमीची कामे योग्य व सुबकपणे पार पाडणे शक्य होण्यासाठी पुरेशी व आवश्यक उपसाधने उपलब्ध करण्यात येतील. उदा. समुचित बसण्याची व्यवस्था, आरोग्यपूर्ण स्थिती. |
| (८७) | अभिलेख कक्ष | अभिलेख व पार्सले यांच्या संग्रहासाठी पुरेशी जागा व सामुग्री पुरविण्यात येईल. कोणत्याही अतिरिक्त कर्मचारीवर्गाचा प्रश्न कर्मचारी संरचना समिती विचारात घेईल. |
| (८८) | वाहन बदली | डेपोच्या ठिकाणी चालकास चालक यांत्रिकाकडून / वाहन परिक्षकाकडून वाहन ताब्यात दिले जाईल व परत घेतले जाईल. |
| (८९) | बस धुण्याच्या फलाटावर छपरी | जेथे शक्य होईल तेथे छपरी उभारण्याची व्यवस्था करण्यात येईल. प्रायोगिक तत्वावर रत्नागिरी विभागात बस धुण्याच्या फलाटावर छपरी उभारण्यात येईल. |
| (९०) | आगारातून बस मार्गावर घेतांना त्यासोबत व्हेईकल टूल देण्यात यावा व त्याच्या सुरक्षिततेसाठी कुलूप बंद कप्पा देण्यात यावा. | सदरची मागणी मान्य करण्यात आली. |
| (९१) | कार्यशाळा कामगारांना चांगल्या दर्जाची हत्यारे पुरविण्यात यावीत. | कार्यशाळा कामगारांना चांगल्या दर्जाची हत्यारे पुरविण्याबाबत सहमती आहे. |
| (९२) | तिकीट मुद्रणालयातील कर्मचा-यांना कार्यशाळेप्रमाणे सर्व सोयी सवलती उपलब्ध करुन द्याव्यात. | तिकीट मुद्रणालयातील कर्मचा-यांना कारखाने अधिनियमाप्रमाणे सोयी उपलब्ध करुन देण्यात येतील. |
| (९३) | दुधाचा पुरवठा करणे | स्प्रे पेंटींग, पॅनल बिटींगचे काम करणा-या कर्मचा-यांना कामाच्या दिवशी मोफत दुधाचा पुरवठा एकवेळेस करण्यात येईल. |

| अ.क्र. | मागणी | समझोता |
|---|---|---|
| (९४) | केंद्र सरकाराच्या धर्तीवर कुटूंब नियोजन सवलती | एखाद्या पुरुष / महिला कर्मचा-याने किंवा त्याच्या पत्नीने / पतीने कुटूंब नियोजनाची शस्त्रक्रिया केली असल्यास अशा कर्मचा-याला राज्य शासनाच्या कर्मचा-यांप्रमाणे कुटूंब नियोजन सवलतीचे फायदे देण्यात येतील. |
| (९५) | चालक / वाहक विश्रांतीगृहे | जेथे आवश्यक आहे त्या ठिकाणी विश्रांतीकक्ष व्यवस्थापन बांधील. चालक / वाहकांच्या या विश्रांती कक्षात आवश्यक असणा-या सुविधांची तरतूद करण्यात येईल. |
| (९६) | आंतर राज्य सेवेत रात्रवस्तीस मुक्कामी असलेल्या कर्मचा-यांसाठी विश्रांतीगृहाची व्यवस्था | आंतर राज्य बस सेवेत रात्रवस्तीस मुक्कामी असणा-या चालक / वाहकांना विश्रांतीगृहाची सोय उपलब्ध करुन देण्याबाबतची मागणी तत्वतः मान्य करण्यात आली आहे आणि त्या दृष्टिने व्यवस्थापन प्रयत्नशील राहील. |
| (९७) | मध्यवर्ती कार्यशाळा / विभागीय कार्यशाळा आगार कार्यशाळेत सर्व सोयीयुक्त विश्रांती गृह असावे व तेथे पिण्यासाठी स्वच्छ व थंड पाणी उपलब्ध करुन देण्यात यावे. | ज्या ठिकाणी २४ तास पाण्याची व्यवस्था आहे अशा ठिकाणी वॉटर कुलर देण्याबाबत विचार करण्यात येईल व इतर ठिकाणी थंड पाण्यासाठी माठाची व्यवस्था करण्यात येईल. |
| (९८) | चालक / वाहकांना लॉकर्सचा पुरवठा | रात्रवस्तीस असणा-या चालक / वाहकांना पुरेशा प्रमाणात आगार / बस स्थानकावर लॉकर्स(कुलूप बंद कप्पे) पुरविण्यात येतील. |
| (९९) | निवासस्थाने | तृतीय व चतुर्थ श्रेणीतील कर्मचा-यांची निवासस्थाने आगार / विभागीय कार्यालये/ कार्यशाळेचे बांधकाम चालू असताना बांधण्याबाबत महामंडळाचीआर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन विचार करण्यात येईल. |
| (१००) | रात्रवस्तीच्या बसगाडयामध्ये घडीच्या बाकाची तरतूद/ चालक -वाहकांसाठी विश्रांती खोल्या. | १९८५-८६ पासून सर्व नविन बसगाडयामध्ये रात्रवस्तीच्या चालक/ वाहकांसाठी रात्रवस्तीच्या ठिकाणी वापरण्याकरिता घडीची बाके पुरविण्याची कार्यवाही व्यवस्थापनाने सुरु केली आहे. त्यानुसार कांही कालावधीमध्ये महामंडळाच्या सर्व गाडयांमध्ये वरील सुविधा उपलब्ध होतील. याशिवाय चालक-वाहकांसाठी रात्रवस्तीच्या ठिकाणी गरजेनुसार विश्रांती खोल्या बांधण्याबाबत प्रयत्न करण्यात येईल. |
| (१०१) | कल्याणनिधीची व्यवस्था | विभागीय कल्याण निधीची व्यवस्था महामंडळाच्या सुचनांच्या व आदेशांच्या अधीनतेने कर्मचारी कल्याण समितीकडे सोपविण्यात येईल. मान्यताप्राप्त संघटनेला कर्मचारी कल्याण समितीवर प्रतिनिधीत्व देण्यात येईल. |

| अ.क्र. | मागणी | समझोता |
| --- | --- | --- |
| (१०२) | शैक्षणिक सहाय्य व कल्याण कारी योजना | सदर योजनेत कामगार दरवर्षी रुपये १२/- व तितकीच रक्कम व्यवस्थापन अंशदान देईल. सदर योजनेतील दरवर्षी रुपये १२/- या दराने कामगारांचे अंशदान, कामगारांना देण्यात येणा-या सानुग्रह रकमेतून कापन्यात येईल व ज्यांना सानुग्रह अनुदान मिळत नाही अशा कर्मचा-यांच्या वेतनातून रुपये १२/- दरवर्षी वसूल करण्यात येतील व अशा प्रकारे गोळा केलेली रक्कम तसेच व्यवस्थापनाचे अंशदान वेगळ्या निधीमध्ये जमा करण्यात येईल. वरील निधीतून कामगारांच्या मुलांना शैक्षणीक सहाय्य देण्यासाठी आणि कामगारांसाठी इतर कल्याणकारी योजना आखण्यासाठी खर्च करण्यात येईल.<br><br>सद्याच्या आस्तित्वात असलेल्या या योजनेत कांही बदल करावयाचा झाल्यास मान्यताप्राप्त संघटनेशी चर्चा करुन बदल करण्यात येईल. |
| | १. शिष्यवृत्ती | अ) सध्या अस्तित्वात असलेल्या शिष्यवृत्ती योजनेनुसार प्रत्येक विभागात कर्मचा-यांच्या पाल्यांना दर शैक्षणिक वर्षासाठी १० शिष्यवृत्त्या अदा करण्यात येतील. प्रादेशिक कार्यालयाचा समावेश त्या-त्या विभागात करण्यात येईल. मध्यवर्ती कार्यालय व भांडार व खरेदी खाते, व भांडार विभाग, कुर्ला व मुद्रणालय, सर्व मध्यवर्ती कार्यशाळा हे या योजनेसाठी स्वतंत्र घटक समजण्यात येतील. परंतु मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडीत मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी याचा समावेश राहील.<br><br>ब) सध्या अस्तित्वात असलेल्या शिष्यवृत्ती योजनेत मान्यताप्राप्त संघटनेशी चर्चा करुन सुधारीत शिष्यवृत्ती योजना तीन महिन्यात तयार करण्यात येईल. |
| | २. बक्षिस योजना | अ) सध्या अस्त्वित असलेल्या बक्षिस योजनेसाठी आहे त्या दराने शंभर बक्षिसे कर्मचा-यांच्या पाल्यांना दर शैक्षणिक वर्षासाठी देण्यात येतील.<br><br>ब) सध्या अस्तित्वात असलेल्या बक्षिस योजनेस मान्यताप्राप्त संघटनेशी चर्चा करुन सुधारीत बक्षिस योजना तयार करण्यात येईल. |
| (१०३) | मृत कर्मचा-यांच्या अवलंबितांना आर्थिक सहाय्य | अ) कर्मचारी महामंडळाच्या सेवेत असताना मृत्यू पावल्यास अशा कर्मचा-यांच्या भविष्यनिर्वाह निधीच्या नामनिर्देशित व्यक्ती / वारस यास रु.१,००,०००/- ( रुपये एक लाख) इतके आर्थिक सहाय्य देण्यात येईल. सदर योजनेसाठी प्रत्येक कर्मचा-यांच्या वेतनातून दरमहा रु.२५/- वसूल करण्यात येतील. सदर योजनेमध्ये महामंडळ दरवर्षी रुपये एक कोटी इतका निधी देईल.<br><br>ब) सदर योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आलेले रुपये एक लाखाचे आर्थिक सहाय्य महामंडळाच्या मुदत ठेव योजनेत ५ वर्षासाठी |

| अ.क्र. | मागणी | समझोता ३३ |
|---|---|---|
| | | गुंतविण्यात येईल. सदर मुदत ठेवीवर महामंडळाच्या नियमाप्रमाणे वेळोवेळी बदलणा-या दराप्रमाणे व्याज देण्यात येईल. मुदत ठेवीची ५ वर्षाची मुदत संपल्यानंतर मुदत ठेवीच्या नुतनीकरण करण्याची मुभा ठेवीदारास राहील. नुतनीकरण न केल्यास मुदत ठेवीची रक्कम ठेवीदारास परत करण्यात येईल.<br>क) सदर योजनेत बदल करावयाचा झाल्यास मान्यताप्राप्त संघटनेशी चर्चा करुन सुधारीत योजना तयार करण्यात येईल. |
| (१०४) | १. मोफत पास | जे कर्मचारी जानेवारी ते जून व जुलै ते डिसेबर या प्रत्येक कालखंडात प्रत्यक्ष कामाचे १०० दिवस हजर असतील अशाच कर्मचा-याला मोफत पास देण्यात येईल. ( १०० दिवसाची कालगणना ही ५। करारातील कलम क्र. १४७ (८) मध्ये नमूद केल्याप्रमाणे राहील.)<br>१. सहा महिन्याच्या प्रत्येक कालखंडात एक म्हणजे जानेवारी ते जून व जुलै ते डिसेंबर यात दोन कौटुंबिक मोफत पास देण्यात येतील. हे पास एक महिन्याच्या अवधीचे राहतील व ते वाढविण्याची कोणतीही तदतूद असणार नाही.<br>२. वर नमूद केलेल्या कोणत्याही एका कालखंडात दोन मोफत पास उपभोगण्याचा पर्याय निवडण्याची मुभा कामगारांना देण्यात येईल.<br>३. स्त्री कर्मचा-यांना त्यांच्या विवाहानंतर कौटुंबिक मोफत पास उपभोगण्याच्या प्रयोजनार्थ अवलंबित म्हणून आई-वडील किंवा सासू-सासरे यांच्या नावाचा समावेश करण्याचा पर्याय निवडण्याची मुभा देण्यात येईल. तथापि एकदा निवडलेला पर्याय अंतिम राहील.<br>४. कर्मचारी व त्याच्या कुटूंबातील त्यांचेवर अवलंबून असलेल्या ६ व्यक्तींना वयाच्या अटीचे निर्बंध न घालता मोफत पास देण्यात येईल. कर्मचा-यावर अवलंबून असणा-या ६ व्यक्तीमध्ये पति / पत्नी, ३ मुले आणि विधवा बहिण यांचा समावेश राहील. आई-वडील/ भाऊ- बहिण हे जर पासधारकावर सर्वस्वी अवलंबून असतील त्यापैकी दोघांचा ६ व्यक्तीत समावेश करण्यात येईल.<br>५. महामंडळाच्या कोणत्याही साध्या बसमध्ये एका वेळी फक्त एक राज्य परिवहन कर्मचारी व / वा त्याचे कुटूंबीय मोफत पासावर प्रवास करण्यास पात्र आहेत. बसमध्ये बसण्याची जागा उपलब्ध नसेल तर त्याला व / वा त्याच्या कुटूंबियांना सक्षम प्राधिका-यांनी परवानगी दिलेल्या जादा बसमधील आसन क्षमतेच्या जास्तीत जास्त २५ टक्क्यामध्ये प्रवास करण्यास मुभा देण्यात येईल.<br>६. मोफत पास देण्यासाठी कर्मचा-याला रजेच्या मंजूरीची शर्त राहणार नाही. जर कर्मचा-याची रजा सक्षम प्राधिका-यांनी मंजूर केली नसेल तर कर्मचा-याच्या पासावर त्याच्या कुटूंबियांना वर निर्दिष्ट केलेल्या शर्थीवर प्रवास करण्याची मुभा राहील.<br>७. अतिथीगृहात जागा उपलब्ध असल्यास विभाग नियंत्रक यांचे परवानगीने अतिथीगृह उपलब्ध करुन देण्यात येईल. |

| अ.क्र. | मागणी | समझोता  |
|---|---|---|
| | | अतिथीगृहाच्या नियमाप्रमाणे आकारणी करण्यात येईल. कर्तव्यार्थ असलेला कर्मचारी अतिथीगृहात आल्यास अतिथीगृह ताबडतोब सोडावे लागेल.<br>८. कामावर असताना दुखापत झाली असेल आणि रा.प.मार्गावरील ठिकाणी औषधोपचारासाठी वैद्यकीय सोय उपलब्ध असेल तर अशा कामगारांना मोफत पास दिला जाईल.<br>९. अपघातात गंभीररित्या जखमी झालेल्या प्रवाशांच्या प्रकरणाप्रमाणे, जो कर्मचारी कामावर असताना झालेल्या अपघातात गंभीररित्या जखमी झाला असेल त्यांच्या निकटतम नातेवाईकाला अपघाताच्या ठिकाणी किंवा कर्मचा-याला अपघातानंतर दाखल केले असेल त्या रुग्णालयात त्याला भेटण्यासाठी जाणे शक्य व्हावे म्हणून अशा नातेवाईकाला एक मोफत पास देण्यात येईल.<br>१०. सर्वसाधारण विद्यार्थ्यांना सवलत देण्याची सध्याची सुविधा रा.प. कर्मचा-यांच्या मुलांनाही लागू होते. आणि सर्वसाधारण विद्यार्थीवर्गासाठी ती जोपर्यंत चालू राहील तोपर्यंत त्यांनाही लागू राहील.<br>११. यापुढे रा.प.च्या कोणत्याही निमआराम गाडीतून जागेच्या उपलब्धतेनुसार तिकीटाचा फरक भरुन प्रवास करण्याची मुभा देण्यात येईल. |
| | २. कर्तव्यार्थ मोफत पास | सर्व कर्मचा-यांना त्यांचे निवासस्थान व कामाचे ठिकाण यामधील सध्याच्या ४० कि.मी. ऐवजी ५० कि.मी. अंतरापर्यंत प्रवासासाठी मोफत पास देण्यांत येतील. |
| | ३. बदली झाल्यानंतर मोफत पास | बदली झालेल्या कामगारासह त्याच्या कुटूंबातील व्यक्ती व घरगूती सामानाची बदलीच्या ठिकाणी वाहतूक करण्यासाठी आणि बसमधून प्रवास करण्यासाठी मोफत पास दिला जाईल. तसेच बदलीनंतर प्रत्येक १२ दिवसांच्या सलग कामानंतर दोन दिवसासाठी उपलब्ध असलेला मोफत पास दोन महिनेपर्यंत देण्याची विद्यमान प्रथा चालू राहील. तथापि ज्यांची त्यांच्या विनंतीनुसार बदली केलेली असते असे कामगार मोफत पास मिळण्यास पात्र असणार नाहीत. |
| (१०५) | खाते वाहने भाडे तत्वावर उपलब्ध करुन देणे. | जेव्हां जेव्हां व जेथे जेथे खाते वाहने भाडयाने देणे कायद्याने/नियमाने अनुज्ञेय असेल तेव्हा तशी सुविधा देण्यात येईल. |
| (१०६) | मार्ग तपासणी पथकातील कर्मचा-यांना होल्डीग बॅग देण्यात याव्या. | मार्ग तपासणी कर्मचा-यांना होल्डीग बॅग देण्याचे मान्य करण्यात आले. मात्र बॅगेचा नमुना तयार करुन संम्मत करुन घ्यावा. |
| (१०७) | संयुक्त विचार विनिमय बैठका | वेगवेगळयां स्तरावर घेण्यात येणा-या संयुक्त विचार विनिमय बैठका जोडपत्र "क" मध्ये नमूद केल्याप्रमाणे घेण्यात येतील. |

| अ.क्र. | मागणी | समझोता |
|---|---|---|
| | |  |
| (१०८) | १. वैद्यकीय सवलत | १. याबाबत सद्याच्या सवलती चालू राहतील. रुग्णालय सेवेसह वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची योजना अधिक व्यापक स्वरुपाची करण्यासाठी मान्यताप्राप्त संघटना प्रतिनिधी व व्यवस्थापनाच्या प्रतिनिधींची एक समिती गठीत करण्यात येईल व समिती आपला अहवाल दोन महिन्यात व्यवस्थापकीय संचालक यांना सादर करील.<br>२. चालक कर्तव्यावर असताना हृदयविकाराचा झटका आल्यास अशा चालकास अपघाताप्रमाणे रु.१०,०००/- पर्यंत आगाऊ रक्कम देण्यात येईल. |
| | २. उपचाराची मुदत | खाजगी डॉक्टरांकडून घेतलेल्या उपचाराची सद्याची पाच दिवसाची मुदत वाढवून सात दिवस इतकी करण्यात येईल. |
| | ३. महामंडळातील कर्मचा-यांच्या खाती असलेल्या रजेमधून दरवर्षी एक दिवसाच्या रजेचे रोखीकरण करण्यात यावे व कर्मचा-यांचा कल्याणविषयी निधी तयार करावा. सदर योजना तयार करण्यासाठी समिती गठित करावी व त्या समितीमध्ये मान्यताप्राप्त संघटनेच्या नामनिर्देशित प्रतिनिधींचा समावेश असावा. | महामंडळातील सर्व कर्मचा-यांच्या खाती असलेल्या एक दिवसाच्या रजेचे दरवर्षी रोखीकरण करण्यात येईल व यातून मिळणा-या रकमेचा निधी उभारुन त्यातून कामगार कल्याण विषयी योजना तयार करण्यात येईल. सदर निधीच्या विनियोगासाठी व्यवस्थापन व मान्यताप्राप्त संघटनेच्या नामनिर्देशित प्रतिनिधींची समिती गठीत करण्यात येईल व विनियोगाचे अधिकार गठित केलेल्या समितीस राहतील. या योजनेच्या सवलती महामंडळातील रोजंदार गट-१ / २ व अर्धवेळ कर्मचारी यांना लागू करण्यात येतील. |
| (१०९) | प्रादेशिक कार्यालयाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी डोळ्यांच्या तपासणीची सुविधा | चालकांच्या डोळ्यांच्या तपासणीसाठी प्रादेशिक/ विभागीय मुख्यालयाच्या ठिकाणी केंद्रे स्थापन करण्यात येतील. |
| (११०) | १. मान्यताप्राप्त संघटनेची व्याख्या | महाराष्ट्र श्रमिक संघ मान्यता व अनुचित कामगार प्रथा प्रतिबंध कायद्यान्वये ज्या श्रमिक संघटनेस मान्यता देण्यात आलेली आहे त्या संघटनेस मान्यताप्राप्त संघटना म्हणून संबोधण्यात येईल. |
| | २. मान्यताप्राप्त संघटनेस द्यावयाच्या सवलती | (अ) मान्यप्राप्त संघटनेचे विभागीय/घटक कार्यकारणीतील २५ पदाधिकारी संरक्षित कामगार म्हणून गणले जातील. दरवर्षी संघटनेने विभागीय/घटक कार्यकारणी व संरक्षित कामगारांची यादी स्थानिक प्रशासनास सादर करतील.<br>(ब) वरील पदाधिका-यांच्या बदल्या करावयाच्या झाल्यास मान्यताप्राप्त संघटनेशी चर्चा करण्यात येईल या ठिकाणी स्पष्ट करण्यात येते की, चर्चा म्हणजे संमती नव्हे ! चर्चा म्हणजे केवळ सल्लामसलत. |

| अ.क्र. | मागणी | समझोता |
|---|---|---|
| | | (क) आगार/ घटक चिटणीसांच्या बदलीच्या संदर्भात विभागीय चिटणीस/ अध्यक्ष यांचेशी चर्चा करण्यात येईल.<br>(ड) विभागीय पातळीवरील मान्यताप्राप्त संघटनेच्या विभागीय अध्यक्ष/ चिटणीस व प्रादेशिक सचिवाची बदली करावयाची झाल्यास राज्य पातळीवरील मान्यताप्राप्त संघटनेच्या सरचिटणीस यांचेशी चर्चा करण्यात येईल.<br>(इ) मान्यताप्राप्त संघटनेच्या राज्य पातळीवरील अध्यक्षाची बदली करावयाची झाल्यास राज्य पातळीवरील सरचिटणीसाशी व राज्य पातळीवरील सरचिटणीसाची बदली करावयाची झाल्यास राज्य पातळीवरील अध्यक्षाशी चर्चा करण्यात येईल.<br>१. विभागामध्ये मान्यताप्राप्त संघटनेच्या पाच पदाधिका-यांना मिळून एक पास देण्यात येईल. सदर पासावर वरील पाच पदाधिका-यापैकी एकावेळी एकाच पदाधिका-यांस प्रवास करता येईल. सदर पासावर त्या विभागाच्या हद्दीतच प्रवास करता येईल.<br>२. मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर व अमरावती प्रदेशातील प्रादेशिक सचिव यांना प्रत्येकी एक पास देण्यात येईल. सदर पासावर त्या-त्या प्रदेशाच्या हद्दीतच प्रवास करण्याची मुभा राहील.<br>३. मान्यताप्राप्त संघटनेच्या राज्य पातळीवरील सात पदाधिका-यांना पास देण्यात येईल. सदर पासावर राज्यभर प्रवास करण्याची मुभा राहील.<br>४. वरील सर्व पासधारकांना रा.प.च्या साध्या बसनेच प्रवास करण्यांची मुभा राहील.<br>५. मान्यताप्राप्त संघटनेच्या वार्षीक अधिवेशनासाठी उपस्थित राहणा-या प्रत्येक विभाग / घटकातील चार कर्मचारी/ पदाधिका-यांना कामाचे ठिकाण ते अधिवेशनाचे ठिकाण व परत असे मोफत पास देण्यात येतील. तसेच अशा अधिवेशनासाठी उपस्थित राहणा-या प्रत्येक विभाग / घटकातील २५ पदाधिका-यांना एकेरी पासेस देण्यात येतील.<br>६. अधिवेशनासाठी प्रत्येक विभाग / घटकातून ५० टक्के सवलतीच्या दराने एक साधी गाडी देण्यात येईल.<br>७. ज्या ठिकाणी संघर्षात्मक परिस्थिती निर्माण होते व एखदे वेळी आगार बंद पडण्याचा संभव निर्माण झाल्यास अशा वेळी मान्यता प्राप्त संघटनेच्या विभागीय अध्यक्ष व सचिव यांना सदर संघर्ष मिटविण्यासाठी जावे लागल्यास अशा वेळी सदर पदाधिका-यांना ऑन डयुटी धरण्यात येईल. |
| (१११) | मान्यताप्राप्त कामगार संघटनांच्या पदाधिका-या विरुद्ध कारवाई करण्यापूर्वी त्या कामगार संघटनेला | मान्यताप्राप्त संघटनेच्या विभागीय / घटक चिटणीस / प्रादेशिक चिटणीस/ सरचिटणीस किंवा विभागीय / घटक अध्यक्ष यांच्याविरुद्ध शिस्त भंगाच्या कारवाई अन्वये बडतर्फी / सेवासमाप्ती या प्रकरणी अंतिम आदेश देण्यापूर्वी राज्य पातळीवरील मान्यताप्राप्त संघटनेच्या अध्यक्ष / |

| अ.क्र. | मागणी | समझोता |
| --- | --- | --- |
| | विश्वासात घेणे. | सरचिटणीसांना विश्वासात घेतले जाईल.<br>तसेच राज्य पातळीवरील पदाधिका-यांविरुद्ध शिस्त भंगाच्या कारवाई अन्वये बडतर्फी / सेवा समाप्ती या प्रकरणी अंतिम आदेश देण्यापूर्वी राज्य पातळीवरील सरचिटणीस / अध्यक्ष यांना विश्वासात घेतले जाईल.<br>अंतिम कारवाई करण्यापूर्वी " विश्वासात घेणे, सल्लामसलत करणे" याचा अर्थ संघटना प्रतिनिधीविरुद्ध अपराधात्मक अंतिम कारवाई करण्यापूर्वी "परिपूर्ण सल्लामसलत होय." |
| (११२) | सेवा विनियम आणि करारान्वये देण्यात आलेल्या सोयीसवलती संघटनेच्या संमतीशिवाय काढून घेऊ नयेत. | सेवा विनियम अंतर्गत आणि कामगार करारान्वये दिलेल्या सोयी सवलतीबाबत बदल करावयाचा असल्यास मान्यताप्राप्त संघटनेशी सल्लामसलत करण्यात येईल. |
| (११३) | मान्यताप्राप्त कर्मचारी संघटनेस कार्यालयासाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत. | मान्यताप्राप्त संघटनेच्या कार्यालयासाठी विभागीय कार्यालये /मध्यवर्ती कार्यालयास जागेच्या उपलब्धतेनुसार जागा उपलब्ध करुन देण्यात येईल. सदर कार्यालयाचे वीज व पाणीपट्टी संघटनेस भरावी लागेल. संघटनेच्या कार्यालयाच्या जागेच्या भाडयामध्ये किती सवलत द्यावयाची याबाबत व्यवस्थापन संघटनेशी चर्चा करुन संघटनेच्या कार्यालयाच्या भाडे आकारणीचा दर निश्चित करण्यात येईल. सदर सवलत मान्यताप्राप्त संघटनेस जो पर्यंत कायदेशीर मान्यता आहे तोपर्यत राहील.व त्यानंतर कार्यालयास दिलेली जागा व्यवस्थापनास परत करावी लागेल. |
| (११४) | कामगार करारापोटी देय होणा-या एकंदर थकबाकी रक्कमेपैकी कमीत कमी रु.१५०/- किंवा १५ टक्के यात जी रक्कम जास्त असेल तितकी रक्कम प्रत्येक कामगाराच्या थकबाकीतून कापून ती रक्कम युनियन फंड म्हणून सर्व तपशीलासह तीन दिवसाच्या आत मान्यताप्राप्त कर्मचारी संघटनेकडे वर्ग करावी. | कामगार करारापोटी निव्वळ देय होणा-या एकंदर थकबाकी रकमेपैकी ५ % (पाच टक्के) इतकी रक्कम प्रत्येक कामगाराच्या थकबाकीतून कापून ती रक्कम युनियन फंड म्हणून मान्यताप्राप्त संघटनेकडे सर्व तपशीलासह वर्ग करण्यात येईल. |
| (११५) | चालक/ वाहकासाठी प्रोत्साहन योजना | आगारातील चालक / वाहक व इतर सर्व कर्मचारीवर्गाला उत्पन्नावर आधारीत अशी प्रोत्साहन योजना तयार करण्याचे मान्य करण्यात आली आहे ती दि.१.१०.९९ पासून प्रायोगिक तत्वावर चालू केली असून त्याचा आढावा व सुधारणाबाबत वेळोवेळी मान्यता प्राप्त संघटनेबरोबर चर्चा करण्यात येईल. |

| अ.क्र. | मागणी | समझोता |
| --- | --- | --- |
| (११६) | हजेरी प्रोत्साहन योजना | जोडपत्र "ड" मध्ये दर्शविल्याप्रमाणे |
| (११७) | सर्व कार्यशाळा कर्मचा-यांना हजेरी प्रोत्साहन योजना लागू करण्यात यावी. | कार्यशाळेतील कर्मचा-याच्या प्रोत्साहन योजनाबाबत नियोजन खाते तपासणी करुन एक वर्षाच्या आंत अहवाल सादर करेल. |
| (११८) | अ) तिन्ही मध्यवर्ती कार्यशाळेतील कामगारांना उत्पन्नावर आधारीत भत्ता (इनसेंटीव्ह) समान प्रमाणात मिळावा व तो दापोडीच्या धर्तीवर कायमस्वरुपी देण्यात यावा.<br>ब) टायर रिमोल्डींगसाठी देण्यात आलेली वेळ अपुरी आहे ती वाढवून देण्यांत यावी. | तिन्ही मध्यवर्ती कार्यशाळेतील उत्पादन उत्तेजन भत्त्याचा मान्यताप्राप्त संघटनेशी चर्चा करुन निर्णय घेण्यात आलेला आहे.<br>टी.आर.पी. मधील कामगारांच्या उत्पादनाशी निगडीत प्रोत्साहन भत्त्याबाबत मान्यताप्राप्त संघटनेशी चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल. |
| (११९) | वाहकांची रोजंदारीपासून सलग १० वर्षे कोणतीही विनातिकीट केस व विनातक्रार सेवा झाल्यास एक वार्षिक जादा वेतनवाढ मंजूर करण्यात यावी. | १.४.९६ रोजी किंवा तदनंतर विना अपराध, विना तक्रार वाहकाची १० वर्षे समय वेतन श्रेणीवर सलग सेवा झाल्यास एक जादा वार्षिक वेतनवाढ देण्याचे मान्य करण्यात आले. समय वेतन श्रेणीवर १० वर्षाची कालगणना करतांना वाहकाची रोजंदार गट-२ मधील सेवा अशी एक जादा वार्षिक वेतनवाढ मंजूर करतांना अंतर्भूत करण्यात येईल. |
| (१२०) | खात्यांतर्गत बढती परीक्षेसाठी नियम आणि विनियम पुरविणेबाबत. | खात्याच्या परिक्षांना बसणा-या कर्मचारीवर्गाला राज्य परिवहन नियम आणि विनियम, सेवेसंबंधी विनियम, स्थायी आदेश प्रशासन परिपत्रके आणि अन्य आवश्यक माहितीच्या पुस्तकांचा पुरेसा संग्रह (इंग्रजी व मराठी) जरुर तर वाजवी पैसे घेऊन उपलब्ध करुन देण्यात येईल. |
| (१२१) | प्रत्येक कर्मचा-यास त्याच्या नावे जमा असलेली भविष्य निर्वाह निधीची रक्कम दर्शविणारी पत्रिका दरवर्षी देण्यात यावी. | भविष्यनिर्वाह निधीच्या पत्रिका कर्मचा-यांना दरवर्षी ६ महिन्याच्या आत दिल्या जातील. ३ महिन्याचे आत भूतपूर्व कर्मचा-यांना किंवा कर्मचारी मृत पावला असल्यास, त्याच्या वारसांना मिळावयाची भविष्यनिर्वाह निधीची रक्कम देण्यात येईल. |
| (१२२) | रा.प. रोख रकमेतून वाहकास खर्च करण्याची परवानगी | निकडीच्या प्रसंगी तारा, दुरध्वनी, अल्पोपहार, भोजन, श्रमिक खर्च इ. साठी रा.प.रोकड जमा रकमेतून खर्च करण्याची वाहकाला मुभा राहील आणि अशा खर्चाचा योग्य तो हिशेब त्याने अधिका-याला सादर करावा. |
| (१२३) | बदलीबाबतची सुचना | सर्वसाधारणपणे बदलीबाबतची सुचना ७ दिवस आगाऊ दिली जाईल व निकडीच्या वेळी हा कालावधी ३ दिवसपर्यंत कमी करण्यात येईल. |

| अ.क्र. | मागणी | समझोता |
|---|---|---|
| (१२४) | बुद्धीमान व मेहनती कामगारांना प्रशिक्षण | बुद्धीमान व मेहनती कामगारांना पुढील प्रशिक्षणासाठी प्रतिनियुक्त करावे आणि योग्य आढळल्यास उचित रिकाम्या जागी सामावून घ्यावे. |
| (१२५) | रात्रविश्रांती | निकडीचा अपवाद वगळता प्रत्येक कर्मचारी २४ तासाच्या कालावधीत अखंड ११ तासांची विश्रांती मिळण्यास हक्कदार राहील. कोणत्याही एका दिवशी काम संपल्यानंतर व दुस-या दिवशी काम सुरु करावयाच्या मधला सलग विश्रांतीचा काल ११ तासाहून कमी करावयाचा झाल्यास मान्यताप्राप्त संघटनेशी विचार विनिमय करण्यात येईल. |
| (१२६) | रात्रपाळी व दिवसपाळी | दिवस व रात्रपाळीतील कामे नियमित व आळीपाळीने देण्यात येतील. |
| (१२७) | कामगारांचे वर्गीकरण | कामगारांचे कुशल, अर्धकुशल किंवा अकुशल असे वर्गीकरण करण्यासाठी महामंडळ एका समितीची स्थापना करेल. ज्यापैकी एकजण मान्यताप्राप्त संघटनेचा प्रतिनिधी असेल. |
| (१२८) | विना-अपघात सुरक्षित सेवेचा बिल्ला प्रत्येक चालकास त्या-त्या टप्प्यावरील सेवेचा कालावधी पूर्ण होताच विना अर्ज देण्यात यावा. | सदरची मागणी मान्य करण्यात आली. |
| (१२९) | चालक-वाहक कर्तव्यावर असतांना त्यांचे हातपाय निकामी झाल्यास अथवा गंभररित्या जखमी झाल्यास त्यांना हलके काम देण्यात यावे. | चालक-वाहक कर्तव्यार्थ असतांना अपघातात गंभीररित्या जखमी झाल्यास व ते नियोजित कर्तव्य पार पाडण्यास असमर्थ ठरल्यास जिल्हा शल्य चिकीत्सक यांनी दिलेल्या प्रमाणपत्राच्या आधारे जागेच्या उपलब्धतेनुसार अशा कर्मचा-यांना तीन महिने हलके काम देण्याचा विचार करण्यात येईल. त्यानंतर कर्मचा-यांना हलके काम द्यावचयाचे किंवा नाही याबाबत प्रकरणपरत्वे व्यवस्थापकीय संचालक निर्णय घेतील. |
| (१३०) | स्त्री कर्मचा-यांसाठी एक खोली (लेडीज रुम) उपलब्ध करुन द्यावी. | आगार / विभागीय / प्रादेशिक व मध्यवर्ती कार्यालयात स्त्री कर्मचा-यांसाठी जागेच्या उपलब्धतेनुसार एक छोटी खोली (लेडीज रुम) उपलब्ध करुन देण्यात येईल. |
| (१३१) | मदतनीस/कनिष्ठ सहाय्यक यांची पदनामे बदलणेबाबत. | मदतनीस यांना यापुढे "सहाय्यक" व कनिष्ठ सहाय्यक यांना यापुढे "वरिष्ठ लिपीक" या नावाने संबोधण्यात येईल. |
| (१३२) | सेवानिवृत्त कर्मचा-यास वैद्यकीय प्रतिपूर्ती करण्याबाबत. | महामंडळाच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांना वैद्यकीय सेवा/ वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती रा. प. कर्मचा-यांच्या धर्तीवर सेवानिवृत्त कर्मचा-याच्या पती/पत्नीस लागू करण्यात येईल. या सवलतीचा दुरुपयोग केल्याचे आढळून आल्यास सवलत बंद करण्यात येईल. |

38

| अ.क्र. | मागणी | समझोता |
|---|---|---|
| (१३३) | निवृत्ती वेतन | महामंडळातील कर्मचा-यांना निवृत्तीवेतन योजना लागू करण्यासंबंधी एका समितीचे गठण करण्यात येईल व सदर समिती आपला अहवाल तीन महिन्यात सादर करेल. |
| (१३४) | तालुका /जिल्हयाच्या ठिकाणी प्रमुख शहरामध्ये कर्मचारी अथवा त्यांच्या कुटूंबियांस वैद्यकीय उपचारासाठी राहण्याची गरज भासल्यास त्यांची निवासाची सोय रा.प.निवासस्थानात करण्यात यावी . तसेच कर्तव्यावर असताना आजारी पडल्यास अथवा अपघात ग्रस्त झाल्यास अशा कर्मचा-यांना दवाखान्यात दाखल केल्यास रा.प.तर्फे उपचार पूर्ण होईपर्यंत काळजी घेण्यासाठी एक प्रतिनिधी देण्यात यावा. | कर्मचारी अथवा त्यांच्या कुटूंबियांस त्यांच्या आजारासंदर्भात मुंबई येथील हॉस्पीटलमध्ये दाखल केलेले असेल अशा प्रसंगी सदर कर्मचा-याबरोबर आलेल्या एका व्यक्तीची रा.प.विश्रांतीगृहामध्ये जागा उपलब्ध असेल तर राहण्याची सोय करण्यात येईल. |
| (१३५) | कार्यशाळेत व आगारात सवलतीची उपहारगृहे उपलब्ध करून देण्यात यावीत. उपहार गृहाचा परवांना देताना रा.प. कामगारास प्राधान्य देण्यात यावे. | कर्मचा-यांच्या सहकारी सोसायटया असतील व त्यांनी उपहारगृह चालविण्याची तयारी दर्शविल्यास त्यांना ती चालविण्यासाठी देण्यात येतील. उपहारगृहात पाणी व वीज विनामुल्य पुरविण्यात येईल. |
| (१३६) | रजेचे रोख रकमेत रुपांतर करतांना १५ दिवसाची किमान रजा उपभोगण्याची अट रद्द करण्यात यावी. सदरची सवलत सर्व प्रवर्गातील कामगारांना लागू करण्यात यावी. | रजा न उपभोगता रजेचे रोख रकमेत रुपांतर करण्याची कार्यशाळा कामगारांना सद्या जी सवलत लागू केलेली आहे. ती सवलत यापुढेही चालक-वाहकांना लागू करण्यात येईल. |
| (१३७) | राज्यातील प्रमुख शहरातील बस स्थानकावर सुसज्ज विश्रांती गृहे चालक-वाहकांसाठी तयार करण्यात यावीत व त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी एका वाहतूक | सदरची मागणी तत्वतः मान्य करण्यात आली. |

| अ.क्र. | मागणी | समझोता |
|---|---|---|
| | निरीक्षकाची नेमणूक देऊन एक परिचर व एक सफाईगार यांची नियमित नेमणूक करण्यात यावी. | |
| (१३८) | महामंडळाने राज्य सरकारची निवृत्ती वेतन योजना लागू करावी व तिची अंमलबजावणी सर्व सेवा निवृत्तांना फायदा देण्यात यावा. | महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने त्यांच्या कर्मचा-यांसाठी तयार केलेली निवृत्त वेतन योजनेचा अभ्यास करुन शिफारस करण्यासाठी एक समिती नेमण्यात येईल. सदर समिती तीन महिन्यात आपला अहवाल सादर करील. |
| (१३९) | विना तिकीट प्रवासी प्रवास करतांना आढळल्यास त्यास सर्वस्वी प्रवाशास जबाबदार धरण्यात यावे. | विनातिकीट प्रवाशी प्रवास करताना आढळून आल्यास मोटार वाहन कायद्याच्या तरतुदीनुसार प्रवाशावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल. गर्दीच्या ठिकाणी स्टॅन्ड बुकींग चालू करण्यात येईल. |
| (१४०) | देखभाल पथकातील मजूरांना खात्यामार्फत बढती परिक्षेस इच्छेनुसार बसण्याची मुभा द्यावी. | देखभाल पथकातील मजुरांना बढतीची संधी उपलब्ध करुन देण्यात येईल. |
| (१४१) | मान्यता प्राप्त संघटनेला वार्षिक अधिवेशनास उपस्थित राहण्यास प्रतिनिधींना आवश्यक ते प्रमाणे खास रजा मंजूर करावी. | कमी गर्दीच्या हंगामात संघटनेचे वार्षिक अधिवेशन असल्यास व महामंडळाच्या कामकाजावर व वाहतूकीवर परिणाम होत नसल्यास कर्मचा-यांच्या रजा मंजूर करण्यात येतील. |
| (१४२) | मानसेवी वैद्यकीय अधिकारी/ मिश्रक यांचे कामांचे तास व मानधन वाढविणे. | ज्या मिश्रकांचा अनुभव, शैक्षणिक पात्रता, जेष्ठता व कामाची निकड या बाबी मानसेवी वैद्यकीय अधिकारी हे तपासून शिफारस करतील. त्या आधारे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल. मानसेवी वैद्यकीय अधिकारी यांचे मानधन शासनाप्रमाणे वाढविले जाईल. |
| (१४३) | ज्या कर्मचा-यांना त्यांचे मुख्यालयाचे बाहेर कर्तव्यावर पाठविले जाते अशा कर्मचा-यांच्या आठवडा सुट्टया आल्या तर त्या रद्द समजण्यात याव्यात. | आठवडा सुट्टया नियमाप्रमाणे देण्यात येतील. |
| (१४४) | वाहक/ चालक कर्तव्यावर अपघातामध्ये जखमी होऊन अपात्र ठरल्यास त्यास विनाअट रा.प. सेवेमध्ये सामावून घेण्यात यावे. | जे चालक/ वाहक कर्तव्यावर असतांना अपघामध्ये जखमी होऊन अपात्र ठरल्यास त्यांना सेवेमध्ये सामावून घेण्याबाबत प्रकरणपरत्वे मा. व्यवस्थापकीय संचालक यांना याबाबत अधिकार देण्यात आले आहेत. |

| अ.क्र. | मागणी | समझोता |
|---|---|---|
| (१४५) | ऐच्छिक सेवानिवृत्ती व सेवा निवृत्त बडतर्फी, राजीनामा, वैद्यकीयदष्टया अपात्र, मृत्यू, सेवेतून कमी करणे इ. कारणामुळे सेवा संपूष्टात येईल तेव्हा सदर कामगारांचे खाती शिल्लक असलेल्या सरासरी अर्ध पगारी रजेचे रुपांतर रोख रकमेत रुपांतर करण्याची मुभा देण्यात यावी. ऐच्छिक सेवा निवृत्ती स्वीकारणा-या कामगारास त्यांचे खाली शिल्लक असणारी अर्जित रजेचे रोख रकमेत रुपांतर करण्याची मुभा द्यावी. | ऐच्छिक सेवा निवृत्ती, स्वेच्छा निवृत्ती, वैद्यकीय अपात्र, मृत्यू, सेवेतून कमी करणे, बडतर्फी व राजीनामा दिलेल्या कर्मचा-यांच्या खाली शिल्लक असलेली अर्जित रजेचे निरनिराळया लागू होणा-या कायद्याच्या तरतूदीचे व कायद्यान्वये अनुज्ञेय रजेच्या मर्यादेपर्यंत रोख रकमेत रुपांतर करण्यात येईल. |
| (१४६) | महामंडळाची सद्याच्या बिकट आर्थिक परिस्थितीतून मार्ग काढण्याच्या दृष्टीने संघटनेस नवीन कामगार करारासाठी व्यवस्थापनाचे मुद्दे देवाण-घेवाण या तत्वावर दिले होते. दिनांक १८.४.१९९९ रोजी मा.मुख्यमंत्री यांनी करारापोटी पहिल्या वर्षी रुपये ७२ कोटीचे पॅकेज डिल जाहिर करतांना कामगार करार हा काम वाढीशी व उत्पादकतेशी निगडीत असावा असे निदेश दिले होते. त्यानुसार उभय पक्षी खालीप्रमाणे मान्य करण्यात आले आहेत. | |
| | १. चालक, वाहकांची कामगिरी त्यांच्या आगारात चालू होऊन त्यांच्याच आगारात संपली असता त्यांना सायनिंग ऑन/सायनिंग ऑफ साठी सध्या द्यावी लागणारी प्रत्येकी ३० मिनिटे व त्याची स्टेअरीग डयुटीमध्ये करावी लागणारी गणना रद्द करुन त्याऐवजी कामगार करार दि.१५.५.५२ मधील मुद्दा क्र.९ मध्ये केलेल्या तरतुदीनुसार सायनिंग ऑन व सायनिंग ऑफसाठी प्रत्येकी १५ मिनिटे दिली जावीत व त्याचा समावेश कामाचे तासामध्ये करणेत यावा. | याबाबत अंतर्गत सेवा सल्ला गटाने मान्यता प्राप्त संघटनेच्या प्रतिनिधीसह अभ्यास करुन याबाबतचा अहवाल तीन महिन्यात सादर करावा असे ठरले. त्यानंतर याबाबत निर्णय घेण्यात येईल. |

43



| अ.क्र. | मागणी | समझोता |
| --- | --- | --- |
| | २. चालक/वाहकांची कामगिरी इतर आगारात चालू होत असल्यास किंवा समाप्त होत असल्यास सायनिंग ऑन / सायनिंग ऑफसाठी प्रत्येकी १५ मिनिटे सध्या दिली जातात व त्याचा समावेश कामाचे तासामध्ये केला जातो. त्याऐवजी सायनिंग ऑन / सायनिंग ऑफसाठी प्रत्येकी १० मिनिटे देण्यात यावीत व त्यांचा समावेश कामाच्या तासात करण्यात यावा. | याबाबत अंतर्गत सेवा सल्ला गटाने मान्यता प्राप्त संघटनेच्या प्रतिनिधीसह अभ्यास करुन याबाबतचा अहवाल तीन महिन्यात सादर करावा असे ठरले. त्यानंतर याबाबत निर्णय घेण्यात येईल. |
| | ३. कोणतेही आगार, मुख्यालय वगळता इतर ठिकाणी चालक,वाहकांनी रात्रवस्ती केली असता त्यासाठी त्यांना सध्या १० मिनिटे प्रत्येकी सायनिंग ऑन / सायनिंग ऑफ साठी दिली जातात. त्याऐवजी अशा ठिकाणी रात्रवस्ती केली असता सायनिंग ऑन / सायनिंग ऑफसाठी प्रत्येकी ५ मिनिटे देण्यात यावीत व त्याचा समावेश कामाचे तासात करण्यात यावा. | याबाबत अंतर्गत सेवा सल्ला गटाने मान्यता प्राप्त संघटनेच्या प्रतिनिधीसह अभ्यास करुन याबाबतचा अहवाल तीन महिन्यात सादर करावा असे ठरले. त्यानंतर याबाबत निर्णय घेण्यात येईल. |
| | ४. मार्गात गाडी १० मिनिटांपेक्षा जास्त थांबल्यास त्यातील १० मिनिटाचा समावेश (जेवणाची वेळ व स्टॅच्युटोरी हॉल्टची वेळ अपवाद करता.) कामाच्या तासात केला जातो ते रद्द करण्यात यावे त्याची गणना स्प्रेडओव्हर (विस्तारीत काल) मध्ये करावी. | याबाबत अंतर्गत सेवा सल्ला गटाने मान्यता प्राप्त संघटनेच्या प्रतिनिधीसह अभ्यास करुन याबाबतचा अहवाल तीन महिन्यात सादर करावा असे ठरले. त्यानंतर याबाबत निर्णय घेण्यात येईल. |

५५

| अ.क्र. | मागणी | समझोता |
|---|---|---|



| | | |
|---|---|---|
| | ५. दोन रात्र वस्त्यांची कामगिरी करुन चालक/वाहक स्व-आगारात तिस-या दिवशी परत आल्यावर त्यांना १२ वाजण्याच्या सुमारास कार्यमुक्त केले जाते ते रद्द करावे व तिस-या दिवशी नेहमीप्रमाणे त्याची ८ तास त्याची कामगिरी करुन घ्यावी. | दोन रात्रवस्त्यांची कामगिरी करुन जे चालक-वाहक स्व-आगारात तिस-या दिवशी परत आल्यावर त्यांना १२ वाजण्याच्या सुमारास कार्यमुक्त न करता त्यांचेकडून नेहमीप्रमाणे ८ तास कामगिरी करुन घेण्यात येईल. |
| | ६. ११ तासांचा विस्तारीत काळ (स्प्रेडओव्हर) मोटार वाहतूक कामगार कायदा १९६१ च्या कलम क्र.१६ प्रमाणे १२ तास करण्यात यावा. | सद्याच्या ११ विस्तारीत तासाऐवजी यापुढे मोटार वाहतूक अधिनियम १९६१ च्या तरतुदीनुसार कामाचे विस्तारित तास १२ राहतील. |
| | ७. टंकलेखकांना ज्या आगाऊ तीन वेतनवाढी देण्यात येतात त्या आगाऊ वेतनवाढी रद्द करण्यात याव्यात. | नव्याने भरती होणा-या टंकलेखकांना यापुढे तीन आगाऊ वेतन वाढी दिल्या जाणार नाही. |
| | ८. सध्या महामंडळातील कर्मचा-यांना जानेवारी ते जून, जूलै ते डिसेंबर अशा दोन सत्रामध्ये एकेक महिन्याच्या कालावधीत दोन मोफत पास देण्यात येतात. परंतु सदर पास देताना सध्या कोणतीही अट घालण्यात आलेली नाही. यापुढे असे मोफत पास देताना त्या कर्मचा-यांची प्रत्येक सत्रात कमीत कमी १०० दिवस उपस्थिती आवश्यक धरुन या उपस्थितीच्या अटीच्या अधीन राहून मोफत पासेस देण्यात यावेत. | १. मोफत पासासाठी १०० दिवसांची कालगणना करतांना कर्मचा-यांनी खालील कारणासाठी उपभोगलेली रजा उपस्थिती समजण्यात येईल.<br>२. मुंबई रा.प.कर्मचारी सेवा विनियमान्वये विकलांगता रजा.<br>३. क्षयरोग, कर्करोग, कुष्ठरोग व अर्धांगवायू यांनी ग्रस्त कर्मचा-याला मंजूर केलेली विशेष रजा.<br>४. प्रशिक्षण / प्रशिक्षणासाठी प्रतिनियुक्ती प्रशासनाच्या सांगण्यावरुन वैद्यकीय तपासणी.<br>५. कर्तव्य म्हणून गणली गेली असेल तेव्हा महामंडळाच्या प्रयोजनार्थ न्यायालयातील उपस्थिती.<br>६. कुटूंब नियोजन कार्यक्रमान्वये कर्मचा-याला मंजूर केलेली विशेष रजा.<br>७. कामगार शिक्षण योजनेमध्ये सहभागी झालेल्या कर्मचा-यांना औद्योगीक दौ-यासाठी मंजूर केलेली विशेष रजा.<br>८. स्त्री कर्मचा-यांच्या बाबतीत तिने उपभोगलेली बाळंतपणाची विशेष रजा उपस्थिती म्हणून समजण्यात येईल.<br>९. कर्मचारी कर्तव्यावर असतांना जखमी झाल्यामुळे त्याच्या अनुपस्थितीचा कालावधी. |
| | ९. डयुटी अॅलोकेशन संगणकावर घेणे . | डयुटी अॅलोकशन संगणकावर घेण्यात येईल. |

| अ.क्र. | मागणी | समझोता |
| --- | --- | --- |



(१४७)

## चालनासंबंधी सुधारणा

१. मोटर परिवहन कामगारांसाठी अधिनियम १९६१ याच्या चौकटीमध्ये आणि महामंडळाने आपला ठराव क्रमांक ९०१२, दिनांक ८ जून १९८१ च्या अन्वये घेतलेल्या निर्णयानुसार व सदर समझोत्याच्या तरतुदीच्या अधिनतेने व्यवस्थापन वेळापत्रके तयार करील. अशा प्रकारे तयार झालेल्या वेळापत्रकांच्या प्रती चालक-वाहकांच्या कर्तव्यनियतांसह सदर समझोत्याचे पक्षकार असलेल्या मान्यताप्राप्त कामगार संघटनेच्या संबंधित डेपो प्रतिनिधीकडे अंमलबजावणीच्या तारखेपूर्वी १५ दिवस पाठविण्यात येतील. मान्यताप्राप्त कामगार संघटनेचे प्रतिनिधी, कायद्याचा काही भंग झाला असेल तर तो वेळापत्रके वाहक-चालक कर्तव्यनियते यावरील त्यांच्या हरकती म्हणून ताबडतोब, परंतु अशी वेळापत्रके मिळाल्यापासून जास्तीत जास्त ७ दिवसाच्या आत, विभागीय वाहतूक अधिका-यांच्या निदर्शनास आणतील. ठरवून दिलेल्या कालावधीमध्ये डेपो प्रतिनिधीकडून काहीही कळविण्यात आले नाही तर काहीही हरकत नसल्याचे गृहित धरण्यात येईल. कायदा व नियम यावर आधारीत काही हरकती असल्यास त्याव्यतिरिक्त मान्यताप्राप्त कामगार संघटनेने केलेल्या सुचनांचासुद्धा व्यवस्थापन विचार करील. हरकतीवर दिलेल्या निर्णयावर मान्यताप्राप्त कामगार संघटनेच्या डेपो प्रतिनिधीनी वेळापत्रकांशी संबंधित काही खात्याची अपिले केली असली तर ती अनिर्णित असेपर्यंत वेळापत्रके व चालक/ वाहक कर्तव्यनियते यांची अंमलबजावणी स्थागित राहणार नाही.

